# गृहिणी

## आरोग्य

### पाण्याचे महत्त्व : जीवनाचा खरा आधार

सृष्टीवरील प्रत्येक सजीवाचे अस्तित्व पाण्यावर अवलंबून आहे. म्हणूनच 'जल हेच जीवन' असे म्हटले जाते. मानवी शरीराचा विचार केला तर आपल्या शरीरात जवळपास ६० ते ७० टक्के भाग पाण्याने व्यापलेला असतो. शरीराचे तापमान नियंत्रित राखण्यापासून ते रक्ताभिसरण प्रक्रिया सुरळीत चालवण्यापर्यंत प्रत्येक लहान-मोठ्या क्रियेसाठी पाण्याची आवश्यकता असते. आजकालच्या धावपळीच्या जीवनशैलीत अनेकजण पुरेशा प्रमाणात पाणी पिणे विसरतात, ज्यामुळे डिहायड्रेशन, थकवा आणि डोकेदुखी यांसारख्या समस्या उद्भवतात. दिवसभरात किमान ७ ते ८ ग्लास म्हणजेच अडीच ते तीन लिटर पाणी पिणे शरीरासाठी अत्यंत आवश्यक आहे. सकाळी उठल्याबरोबर उपाशी पोटी कोमट पाणी पिण्याने शरीरातील विषारी घटक बाहेर पडतात आणि पचनक्रिया गतिमान होते. तसेच, पुरेशा पाण्यामुळे शरीरातील ऊर्जेची पातळी टिकून राहते आणि आळस दूर होतो. पाण्याचा थेट संबंध आपल्या त्वचेच्या सौंदर्याशीही आहे. शरीरात पाण्याचे प्रमाण उत्तम असेल तर त्वचा नैसर्गिकरित्या चमकदार आणि तजेलदार दिसते. वजनावर नियंत्रण ठेवण्यासाठी देखील पाणी मदत करते; जेवणापूर्वी थोडे पाणी पिल्याने गरजेपेक्षा जास्त खाणे टाळले जाते. निसर्गाने आपल्याला दिलेले हे मोफत आणि सर्वात शक्तिशाली औषध आहे, ज्याचा योग्य वापर करून आपण अनेक आजारांना स्वतःपासून दूर ठेवू शकतो.

## पाककला

### चॉकलेट पेढा

**साहित्य :** मिल्क पावडर १ कप, कंडेन्स्ड मिल्क (मिल्कमेड) १/२ कप, कोको पावडर २ मोठे चमचे, साजूक तूप २ छोटे चमचे, वेलची पावडर १/२ छोटा चमचा, सजवण्यासाठी बारीक कापलेले पिस्ता किंवा बदाम.

**कृती :** एका नॉन-स्टिक कढईमध्ये साजूक तूप हलके गरम करा. गॅसची आच अगदी मंद ठेवा आणि त्यात कंडेन्स्ड मिल्क आणि मिल्क पावडर एकत्र घालून व्यवस्थित मिक्स करा. त्यानंतर त्यात कोको पावडर चाळून टाका, जेणेकरून पिठात गुठळ्या होणार नाहीत. हे सर्व मिश्रण मंद आचेवर सतत ढवळत राहा. साधारण ४ ते ५ मिनिटांत हे मिश्रण कढईच्या कडा सोडू लागेल आणि त्याचा एक मऊ गोळा तयार होईल. मिश्रण जास्त सुकू देऊ नका, नाहीतर पेढे कडक होतील. आता गॅस बंद करा आणि त्यात वेलची पावडर घालून मिक्स करा. हे मिश्रण एका प्लेटमध्ये काढून थोडे कोमट होऊ द्या. मिश्रण हाताला सहन होईल इतके कोमट झाल्यावर, हाताला थोडे तूप लावून त्याचे छोटे छोटे गोल पेढे वळून घ्या. पेढ्याच्या मध्यभागी अंगठ्याने हलका खड्डा करून त्यावर पिस्त्याचा किंवा बदामाचा तुकडा दाबून सजवा. झटपट आणि चवदार चॉकलेट पेढे खाण्यासाठी तयार आहेत.

## वास्तू

### घरातील खिडक्या आणि प्रकाश

घराच्या उत्तर आणि पूर्व दिशेला जास्तीत जास्त खिडक्या असाव्यात, जेणेकरून सकाळी सूर्याचा कोवळा प्रकाश आणि ताजी हवा घरात येईल. यामुळे घरात राहणाऱ्या सदस्यांचे आरोग्य आणि बुद्धी तल्लख राहते. संध्याकाळच्या वेळी घरातील सर्व खिडक्या आणि दारे किमान अर्धा तास उघडी ठेवावीत.

## सौंदर्य

केसांना शाम्पू करण्यापूर्वी अर्धा तास आधी कढीपत्ता आणि खोबरेल तेल एकत्र गरम करून तयार केलेले तेल लावावे, यामुळे केस अकाली पांढरे होत नाहीत.

## सल्ला

वड्यांचे पीठ कालवताना त्यात १ चमचा कडकडीत गरम तेल (मोहन) घाला. यामुळे भजी तेलकट होत नाहीत.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

**शनिवार, दि. ११ जुलै २०२६**

**भागवत एकादशी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ कृष्णपक्ष, कृत्तिका ११।०४, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** नोकरी-व्यवसायात नवीन संधी आणि आर्थिक लाभ होईल.

**वृषभ :** अचानक धनलाभ होईल आणि कुटुंबाचे सहकार्य मिळेल.

**मिथुन :** धावपळीचा दिवस, प्रवासातून फायदा आणि अडकलेले पैसे मिळतील.

**कर्क :** मानसिक शांतता लाभेल आणि मित्रांची भेट होईल.

**सिंह :** कामात मोठे यश मिळेल आणि प्रतिष्ठा वाढेल.

**कन्या :** कामाचा ताण राहील, पण आर्थिक गुंतवणुकीसाठी चांगला दिवस.

**तूळ :** धनाची आवक वाढेल आणि नवीन कामाची सुरुवात होईल.

**वृश्चिक :** जुने वाद संपतील आणि नोकरीत पदोन्नती होईल.

**धनू :** शिक्षणात यश मिळेल आणि उत्पन्नाचे नवीन मार्ग मिळतील.

**मकर :** मालमत्तेचे व्यवहार पूर्ण होतील आणि भागीदारीत फायदा होईल.

**कुंभ :** पराक्रम वाढेल आणि भाऊ-बहिणींकडून चांगली बातमी मिळेल.

**मीन :** आर्थिक बाजू मजबूत राहील आणि घरात आनंद असेल.

## शब्दगंध क्र. ७४७० सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ■ | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | ९ | | |
| | ■ | ■ | १० | | | ■ | |
| ■ | ११ | १२ | | ■ | ■ | १३ | |
| १४ | | | | ■ | १५ | | |
| १६ | | ■ | १७ | १८ | ■ | | ■ |
| | ■ | १९ | ■ | | ■ | २० | २१ |
| २२ | | | | ■ | २३ | | |

**आडवे शब्द :-** १) कायम हिरवेगार असणारे ५) फुलातील गोड रस; मकरंद ७) महिना; माह; माहे ८) एक मराठी आडनाव; मुनीम; हिशोबी कारकून (पूर्वीच्या काळातील) १०) स्मशानभूमी ११) एक मराठी आडनाव; एक थोर समाजसेवक घराणे १३) इच्छा; अस्तित्व; बैलगाडीच्या चाकाचा कणा १४) मराठीत 'कॉम्प्युटर' १५) एक पक्षी; वायस; काग; काक १६) निवासस्थान; गेह; गृह १७) मलेरिया पसरविणारा एक कीटक; मच्छर २०) अरुंद तोंडाची लांबट पिशवी; कोणत्या प्रकारचा २२) विष्णूचे एक नाव २३) एक अरबी देश

**उभे शब्द :-** १) सारखा; बरोबर; सम; पंचप्राणांपैकी एक २) नोकर; चाकर; पाईक ३) ज्याला कामधंदा नाही व जो रिकामा बसून आहे असा ४) एक हिंस्र जंगली प्राणी ५) इंग्रजीत पैसा तर मराठीत मांजर ६) धश्चोट; दांडगा; अडाणी; पशुतुल्य ९) जेथे धातू सापडतात असा जमिनीतील खोलवरचा खड्डा ११) खाण; साठा; संग्रहालय १२) सोळा पायल्या धान्याचे पूर्वीचे एक माप १३) गरज; नड; जरुरी १४) 'युनियन'चे मराठी रूप १८) चालू काळात; वर्तमान स्थितीत १९) आंब्याचे बी; बाठा २१) तात्पर्यार्थ; चिंचेचे एक कालवण

### शब्दगंध क्र. ७४६९ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प | र | वा | न | गी | ■ | भ | व |
| व | म | न | ■ | त | ल | वा | र |
| न | ■ | वा | गो | र | ■ | नी | द |
| ■ | त | ■ | त | मा | म | ■ | ■ |
| ■ | गा | न | ■ | य | ज | मा | न |
| सो | द | ह | र | ण | ■ | त | वा |
| पा | ■ | र | ज | ■ | बे | ■ | ग |
| न | ळ | ■ | त | र | त | री | त |

### फिल्मीचक्कर क्र. १२४४ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | ल | का | या | ज्ञि | क | ■ | दी |
| ■ | ता | ■ | रा | ■ | ■ | ■ | वा |
| प्या | ■ | ना | ना | पा | टे | क | र |
| सा | ध | ना | ■ | नी | ■ | म | ■ |
| ■ | ■ | क | ■ | ■ | फू | ल | ■ |
| अ | म | र | प्रे | म | ■ | ह | म |
| मी | ■ | ते | ■ | नी | ■ | स | ■ |
| र | ती | ■ | उ | षा | ■ | न | या |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** कठीण काळात सतत प्रयत्न करणे म्हणजे यशाच्या जवळ जाणे होय.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### पाऊस पडण्यापूर्वी मातीचा सुगंधी वास (मृद्गंध) का येतो?

उन्हाळ्याच्या कडक उन्हाने होरपळून निघाल्यानंतर जेव्हा पावसाचे पहिले थेंब जमिनीवर पडतात, तेव्हा सभोवताली एक अतिशय सुंदर आणि सुगंधी वास पसरतो. या मातीच्या सुवासाला आपण मराठीत 'मृद्गंध' म्हणतो, तर शास्त्रीय भाषेत याला 'पेट्रीकोर' असे नाव आहे. लहान असो वा मोठे, प्रत्येकालाच हा सुगंध मनापासून आवडतो आणि पाऊस आल्याचा आनंद द्विगुणित करतो. पण तुम्हाला माहीत आहे का, की हा सुंदर सुगंध केवळ पाण्याचे थेंब मातीवर पडल्याने येत नाही, तर त्यामागे निसर्गाचे एक अनोखे आणि रंजक विज्ञान दडलेले आहे.

ही किमया प्रामुख्याने तीन वेगवेगळ्या घटकांच्या एकत्र येण्यामुळे घडते. या सुवासाचे सर्वात महत्त्वाचे आणि मुख्य कारण म्हणजे मातीमध्ये राहणारे 'क्टिनोमायसेट्स' नावाचे सूक्ष्म जीवाणू (बॅक्टेरिया) होय. जेव्हा खूप दिवस पाऊस पडत नाही आणि हवामान कोरडे किंवा उष्ण असते, तेव्हा हे जीवाणू स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी मातीमध्ये अतिशय लहान बीजाणू तयार करतात. हे बीजाणू दीर्घकाळ सुक्या मातीत सुप्त अवस्थेत राहतात. जेव्हा पावसाचे पहिले थेंब या कोरड्या मातीवर आदळतात, तेव्हा मातीतील हे सूक्ष्म बीजाणू हवेत उडतात.

या प्रक्रियेदरम्यान त्या जीवाणूंमधून 'जिओस्मिन' नावाचे एक विशिष्ट रासायनिक संयुग बाहेर पडते. मानवाचे नाक या जिओस्मिन रसायनाचा वास ओळखण्यात अतिशय संवेदनशील असते. हवेत अगदी अब्जावधी भागांमध्ये याचा एक छोटासा अंश जरी मिसळला, तरी आपले नाक तो सुगंध लगेच ओळखू शकते. मृद्गंध येण्याचे दुसरे कारण म्हणजे वनस्पती आणि झाडांमधून निघणारे तेल. उन्हाळ्याच्या दिवसांत किंवा उष्ण हवामानात काही झाडे आणि वनस्पती एका विशिष्ट प्रकारचे तेल उत्सर्जित करतात. हे तेल आसपासच्या मातीत आणि खडकांमध्ये शोषले जाते. जेव्हा पावसाचे पाणी या मातीवर पडते, तेव्हा मातीत साठलेले हे वनस्पतींचे तेल आणि जीवाणूंचे जिओस्मिन रसायन एकत्र होऊन हवेत तुषारांच्या स्वरूपात पसरतात. पावसाचा थेंब जमिनीवर पडताना जो लहान बुडबुडा तयार होतो, त्या बुडबुड्याच्या माध्यमातून हा सुगंध हवेत सर्वत्र पसरतो आणि वाऱ्यासोबत आपल्यापर्यंत पोहोचतो.

या दोन्ही घटकांसोबतच तिसरा एक महत्त्वाचा घटक म्हणजे हवेतील ओझोन वायू होय. अनेकदा पाऊस पडण्यापूर्वी किंवा पाऊस पडत असताना आकाशात विजा चमकतात. विजांच्या तीव्र उष्णतेमुळे हवेतील ऑक्सिजन आणि नायट्रोजनचे रेणू एकमेकांपासून वेगळे होतात आणि त्यातून 'ओझोन' वायूची निर्मिती होते. हा ओझोन वायू वाऱ्याच्या झोतासोबत जमिनीच्या दिशेने खाली येतो. ओझोनचा वास काहीसा तीक्ष्ण आणि अत्यंत ताजा असतो. जेव्हा हा ओझोन वायू मातीच्या वासासोबत आणि वनस्पतींच्या तेलासोबत हवेत मिसळतो, तेव्हा एक वेगळाच सुगंधी अनुभव मिळतो. म्हणूनच, पाऊस प्रत्यक्षात पडण्यापूर्वीच आपल्याला हवेत एक वेगळा सुवास जाणवतो आणि पाऊस येणार असल्याचा अंदाज येतो. थोडक्यात सांगायचे तर, पावसाळ्यात येणारा मातीचा सुगंधी वास हा केवळ पाण्याचा खेळ नसून, मातीतील सूक्ष्म जीवाणू, वनस्पतींचे तेल आणि हवेतील ओझोन वायू यांच्या एकत्रित रासायनिक प्रक्रियेचा तो एक अद्भुत निसर्गचमत्कार आहे.

## तिमीरातूनी तेजाकडे

एका घनदाट जंगलात अमावास्येची रात्र होती. आकाश ढगांनी भरलेले असल्याने चंद्र आणि चांदण्यांचा कुठेच पत्ता नव्हता. संपूर्ण जंगलात इतका काळाकुट्ट अंधार पसरला होता की समोरचे झाडही दिसत नव्हते. सगळे प्राणी आणि पक्षी आपापल्या घरात भीतीपोटी लपून बसले होते.

त्याच वेळी, एका छोट्याशा झाडाच्या पानावरून एक लहानसा काजवा हवेत उडाला. त्याच्या शरीरातून मंद, पिवळसर-हिरवा प्रकाश पडू लागला. तो आनंदाने जंगलात इकडेतिकडे फिरू लागला.

ते पाहून तिथे जवळच बसलेला एक मोठा घुबड म्हणाला, अरे छोट्या काजव्या, वेडा आहेस का तू? बघतोस ना भोवती किती अथांग आणि भयानक अंधार आहे! तुझ्या या इवल्याशा प्रकाशाने काय होणार आहे? या अथांग काळोखाला तू कसा हरवणार? उगाच कशाला त्रास करून घेतोस, गपचूप एका पानाच्या मागे लपून बस.

काजवा हवेतच थांबला, त्याने मऊ आवाजात घुबडाला उत्तर दिले: आजोबा, तुमचे म्हणणे अगदी खरे आहे. हा अंधार माझ्यापेक्षा लाखो पटीने मोठा आणि शक्तीशाली आहे. माझ्या इवल्याशा प्रकाशाने हे संपूर्ण जंगल कधीच उजळणार नाही, हे मलाही ठाऊक आहे. पण म्हणून मी माझा स्वतःचा प्रकाश पाडणे का सोडावे? मी संपूर्ण जंगलाचा अंधार नाही मिटवू शकत, पण मी जिथून उडेन, तिथला दोन इंचाचा अंधार तर नक्कीच दूर करेन ना! माझ्या वाट्याचा प्रकाश पसरवणे हे माझे कर्तव्य आहे.

काजव्याचे हे बोलणे ऐकून जंगलातील इतर शेकडो काजवेही आपापल्या पानातून बाहेर आले. पाहता पाहता हजारो काजव्यांच्या लुकलुकाटाने ते संपूर्ण जंगल एखाद्या दिव्यांच्या माळेसारखे चमकू लागले. त्या मोठ्या अंधाराला त्या छोट्या काजव्यांच्या एकजुटीने पळवून लावले होते.

बोध : समाजात किंवा जगात मोठा बदल घडवण्यासाठी स्वतःला लहान समजू नका. तुम्ही तुमच्या पातळीवर जे काही छोटे, चांगले काम कराल, त्याने तुमच्या आसपासच्या लोकांचे जीवन नक्कीच उजळू शकते. थेंबाथेंबानेच तळे साचते!

## आत्मशक्ति



चेतनामय आहे? आपल्या सर्व चिंता व अडचणींना दूर ठेवा. दिवसांतून काही वेळ असा ध्यानाभ्यास करा! आपण ध्यानाभ्यासाची पद्धत शिकल्यानंतर आपणास शांत होऊन ध्यानास बसणे सहज जमेल व ह्यामुळे आपणाला आत्मानुभव घेण्यासाठी मदत मिळेल.निःस्वार्थ प्रेम आम्हाला प्रेम करणे आवडते आणि प्रेमाची आम्ही अपेक्षाही करतो. सारे आयुष्य आम्ही वेगवेगळ्या संबंधात प्रेमाचा शोध घेत असतो. आम्हाला आनंद आणि भरपूर उत्साहाने भरलेले प्रेम हवे असते. आमच्यात काही कमतरता असली तरीही आमच्या प्रेमाचा स्वीकार करणारे प्रेम आम्हाला हवे

### त्यांचे आश्चर्यकारक संबंध

असते. आम्हाला असे प्रेम हवे असते की ते आम च्यापासून केव्हाही दूरावले जाऊ नये, नेहमीच आम ची सोबत संगत करणारे प्रेम आम्हाला हवे असते. जीवनभर आम्ही वेगवेगळ्या संबंधात मिळणाऱ्या प्रेमाचा अनुभव घेत असतो. असे प्रेम आईवडिल व त्यांची मुले, बंधुभगिनीत, मित्रमित्रांमध्ये, प्रियकर प्रेयसीमध्ये वा पती-पत्नीमध्ये असू शकते. या सर्व नात्यागोत्यात असेच प्रेम सांभाळले जावे, अशीच आम्ही इच्छा करतो. ह्या संबंधांत जर काही कम ीपणा आला तर आम्ही निराश होतो. आमच्यात जे काही प्रेम आहे ते असेच उत्तम प्रकारे चालावे, अशी आमची इच्छा असते. पण ह्यात यश आले नाही तर आम्ही निराश होतो. काही संबंधातील प्रेमात तर आम्ही अपेक्षेपेक्षा जास्त यशस्वी होतो, आमचे संबंध अधिकच बळकट होत जातात, परंतु त्याचबरोबर इतर प्रेम संबंध आम्ही संपवितो. जर कोणा एकाशी आमचे संबंध इतके आश्चर्यकारक जुळतात की, रोग, विरह वा मृत्युही आम्हाला दूर करू शकत नाही. असे दृढ, सतत टिकणारे अमर प्रेम असू शकते काय? असा विचारही मनात डोकावतो की, ज्यात विरह वेदना नाही, ज्याचा कधीही शेवट होत नाही असे प्रेम असेल का ? होय! असे अतूट आणि दृढ प्रेम आमच्या आत्म्यात आहे. आमच्या अंतरी ते निर्मळ प्रेम आमची वाट पहात आहे. ते मिळाल्याने आम्ही उत्साह, प्रसन्नता आणि (क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

कामाच्या ठिकाणी काहीतरी देण्याची संधी आपल्या प्रत्येकाकडे असते. 'आज मी चांगली नवीन नाती निर्माण करेन' किंवा 'मी प्रत्येकाशी आदरपूर्वक बोलेन,' या हेतूने आज कामावर जाऊ या. फक्त पैसे किंवा बढती मिळवण्याच्या हेतूने नको. दिवसभरात आपण दुसऱ्यांना काय देतो हे तपासणं गरजेचं आहे. आपल्या आतला चांगुलपणाचा प्रवाह जपला पाहिजे – हा जीवन जगण्याचा नैसर्गिक मार्ग आहे, हेच जीवन आहे. हा प्रवाह आपण रोखला तर आयुष्य साचलेलं राहील म्हणजेच आहे तिथेच राहील.

चला असा विचार निर्माण करू या, 'कामाच्या ठिकाणी किंवा येण्या-जाण्याच्या मार्गात मला जे कोणी भेटेल त्यांच्या बरोबर मी काहीतरी चांगलं शेअर करेन.' बाकी काही नाही तर आपण एखादी

### नवीन नाती निर्माण केली

स्माइल (स्मितहास्य) तरी नक्कीच देऊ शकतो. जेव्हा आपण काहीतरी देतो तेव्हा ती ऊर्जा प्रथम आपल्याला मिळते आणि नंतर इतरांना.

तुम्ही कोणाच्या घरी कधी सुरेश ओबेरॉय : मी एका पुस्तकात वाचलं होतं की जर रिकाम्या हाताने गेलात तर त्या घरात पाऊल ठेवताना त्या घराला आशीर्वाद द्यावेत. या घरावर देवाची कृपा राहावी, या घरात आनंद आणि शांतता नांदावी, असं म्हणावं. शिवानीदीदी : किती सुंदर ! खूपच चांगले.

सुरेश ओबेरॉय : कुठल्याही भेटवस्तूपेक्षा आशीर्वाद शिवानीदीदी : आपण संपूर्ण दिवस आशीर्वाद देऊ शकतो.

सुरेश ओबेरॉय : तुम्ही म्हणालात त्याप्रमाणे, जेव्हा मी चित्रपटाच्या शूटिंगसाठी जातो तेव्हा मी प्रत्येकासाठी सकारात्मक विचार निर्माण करू शकतो. शिवानीदीदी : सगळ्यांकडे हसून पाहा आणि मनात त्यांच्यासाठी सुंदर विचार निर्माण करा. जर तुम्ही थांबून त्यांच्याशी बोलू शकलात तर अजून चांगलं. या छोट्या छोट्या कृतींतून आपण आपली ऊर्जा आतून बाहेर प्रवाहित करतो. दिवसभर आपली ऊर्जा प्रवाही ठेवल्याने मोठे परिणाम साधता येतात. हा झाली वागण्याची एक पद्धत. दुसरी पद्धत, लोकांमध्ये वावरताना चेहऱ्यावर कोणतेही भाव न दाखवणं, चेहरा रूक्ष ठेवणं आणि कोणाला काहीही देण्याची इच्छा न बाळगणं. जेव्हा आपण इतरांना काही देतो, तेव्हा ते त्यांना आवडतं.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बंडू : बायको आणि गुगलमध्ये काय फरक आहे?
धोंडू : काहीच नाही! आपलं वाक्य पूर्ण व्हायच्या आधीच दोघंही सल्ले द्यायला सुरु करतात!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ सूर्यप्रकाश पृथ्वीवर पोहोचण्यासाठी साधारण किती वेळ लागतो?
– सुमारे ८ मिनिटे २० सेकंद

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

काही दिवसांतच पांढरे पाणी जाणे कमी होते. ८) आहारामध्ये सहसा भेंडी न किडलेली ताजी व कोवळी वापरावी. कोवळ्या भेंडीची सुकी भाजी, सूप बनवावे. तसेच कढीमध्ये भेंडीचे काप घालावेत.

सावधानता :

भेंडीवर कीड पटकन पडत असल्यामुळे कीड लागू नये म्हणून तिच्यावर कीटकनाशकांचा मारा भरपूर प्रमाणात करतात. अशा वेळी भेंडी शरीराला बाधक ठरू नये म्हणून कोमट पाण्यात तिला दोन व तीन वेळा स्वच्छ धुऊन मगच तिचा आहारात वापर करावा.

आरोग्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची

### मेथी

असलेली मेथी ही भाजी सर्वांनाच परिचित आहे. संपूर्ण भारतभर मेथीचे पीक घेतले जात असून, स्वयंपाकघरात तिचे स्वतःचे एक महत्त्वपूर्ण स्थान आहे. शरीर निरोगी ठेवण्यासाठी मेथीची भाजी निसर्गाने दिलेले वरदानच आहे. मेथीला संस्कृतमध्ये 'मेथिका', इंग्रजीमध्ये 'फेनूग्रीक', तर शास्त्रीय भाषेत 'नेला फोनुमग्रीकम' या नावाने ओळखली जाणारी मेथी 'पॅपिलिओनसी' या कुळातील आहे.

आहारामध्ये मेथीची भाजी व बी हे दोन्ही उपयोगात आणले जातात. मेथीचे रोप हे पंचवीस ते पन्नास सें.मी.पर्यंत वाढते. त्याला पिवळ्या रंगाची फुले व तपकिरी छोट्या शेंगा येतात. या शेंगांच्या आतमध्ये बी असते व या बियांचा उपयोग फोडणी देण्यासाठी, मसाल्यासाठी व औषधी म्हणूनही करतात. यांची पाने आकाराने लहान, अंतरा अंतरावर व तीन-तीन पाने एकत्र अशी असतात. याच मेथीच्या कोवळ्या पानांची भाजी ही चवीला किंचित कडू पण रुचकर लागते व त्यासोबत शरीर निरोगी ठेवते. **(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# १६२५ साली सुरू झाला पंढरपूर वारकरी पालखी सोहळा

वारकरी संप्रदायाचे व भारतीय भक्तीची परंपरेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे इथे विठ्ठलाच्या दर्शनाकरिता समाजातील सर्व स्तरातील लहान थोर भक्तगण पंढरपूर वारीकरिता सहभागी होऊ शकतात आपण अनेक दिंड्या पालख्या पाहिले असतील की त्यामध्ये सर्वच समाजातील विठ्ठल भक्त मनोभावे वारकरी म्हणून सहभागी झाले दिसतात पण ही वारी परंपरा कधी सुरू होणार असे आहे तर ती सोळाशे पंचवीस सालामध्ये सुरू झाले असल्याची नोंद वारकरी संप्रदायात पाहावयास मिळत आहे

वारंवार केली जाते ती वारी. यात विणेकऱ्यांच्या पुढाकारात काही वारकरी टाळ–मृदंगाचा गजर करत निघतात तेव्हा त्याला दिंडीचे स्वरूप येते. ही दिंडी अगदी संत नामदेव महाराजांपासून निघत असल्याचा इतिहास आहे. संत तुकाराम महाराज देखील १४ टाळकरी आणि भाविक सोबत घेऊन आषाढी वारी करीत असे. भक्त पुंडलिकाने आई–वडिलांची करीत असलेली सेवा पाहून देव प्रसन्न झाले आणि भेटण्यासाठी पंढरपुरात आले. पुंडलिकाने वीट भिरकावली आणि येथे उभा राहा, असे सांगितले आणि तेव्हापासून देव पंढरपुरात आहेत, असे पुराणात आहे. संत ज्ञानदेवाचे वडीलही वारी करीत असे; परंतु संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वरांनी खऱ्या अर्थाने वारीला एक सामाजिक अधिष्ठान प्राप्त करून दिले.

### रामकृष्णहरी ते ज्ञानोबा–तुकाराम

संत तुकाराम महाराज यांच्या पश्चात तपोनिधी नारायण महाराज देहूकर यांनी वारीचा वारसा सुरू ठेवला. यात त्यांनी देहू येथून संत तुकाराम महाराजांच्या पादुका घेऊन आळंदीला आणत येथून संत ज्ञानेश्वर महाराज यांच्याही पादुका घेत. दोन्ही पादुकांसमवेत वारी सुरु कर. त्याआधी वारकरी सांप्रदायात 'रामकृष्णहरी' हे भजन केले जात असे. नारायण महाराजांना जागोजागी लोक विचारू लागले या कोणाच्या पादुका आहेत. त्यावर नारायण महाराज सांगत 'ज्ञानोबा–तुकाराम', पुढे याचे रूपांतर भजनात झाले आणि सर्व वारकरी 'ज्ञानोबा–तुकाराम'चा जयघोष करायला लागले.

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा पुणे जिल्ह्यातीलच आळंदी आणि देहू गावातून निघतो, देहू गावातून तुकोबांची पालखी निघाल्यावर दुसऱ्या दिवशी आळंदीतून माऊलींची पालखी प्रस्थान ठेवते. तुकोबांची पालखी एक मुक्काम करून तर माउलींची पालखीही एक दिवस मुक्काम करून पुण्यात एकाच दिवशी मुक्कामी येतात. अवघ्या वारीमध्ये केवळ पुणे शहर असे एकमेव शहर आहे जिथे या दोन्ही पालख्या दोन दिवस मुक्कामी असतात. दोन दिवसाच्या मुक्कामानंतर तिसऱ्या दिवशी दोन्ही पालख्या भल्या सकाळी पंढपूरकडे प्रस्थान ठेवतात. पुण्यातील हडपसर पर्यंत दोन्ही पालख्या एकत्रच प्रवास करतात आणि हडपसर पासून दोन्हीपालख्यांचा मार्ग बदलतो. माउलींची पालखी डावीकडे वळून सासवडकडे रवाना होते तर तुकोबांची पालखी सरळ जात इंदापूरकडे निघते.

### तुकारामांचे तृतीय चिरंजीवांपासून पालखी सोहळ्याला सुरवात

संत ज्ञानेश्वर महाराजांनी समाजातील अनिष्ट प्रथा–परंपरा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. संत साहित्य केवळ धार्मिक बाब नसून सांस्कृतिक ठेवा आहे. वारीचा इतिहास खूप मोठा आहे. पालखी सोहळ्याचा इतिहास संत तुकाराम महाराजांचे तृतीय चिरंजीव नारायण महाराज यांच्यापासून सुरू होतो. नारायण महाराजांनीच १६२५ साली संत तुकाराम महाराजांच्या पादुका घेऊन आळदर्दीत आले आणि संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका घेऊन 'ज्ञानोबा–तुकाराम'चा जप करत पंढरपूरला निघाल्याचा इतिहास आहे. त्याचे अनेक दाखले संस्थानाकडे आहेत.

### एकाच पालखीत ज्ञानोबा–तुकाराम !

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या घराण्याचे मूळ पुरुष म्हणजे विश्वंभर बाबा. तेव्हापासूनच घरात वारीची परंपरा होती.

विश्वंभर बाबांच्या आई त्यांना म्हणत, 'तुझ्या वडिलो वडिली । निर्धारी चालविली पंढरीची वारी ।। त्याशी सर्वथा अंतर न करी । तरीच संसारी सुफळपण' याच विश्वंभर बाबांनी सर्वांत प्रथम आपल्या वाड्यात एकत्रित विठ्ठल–रखुमाई या स्वयंभू मूर्तीची स्थापना केली. हाच वसा आणि वारसा घेऊन संत तुकोबाराय यांनी चौदा टाळकरी आणि काही वारकऱ्यांच्या समवेत पंढरीची वारी अखंड चालू ठेवली. पुढे संत तुकाराम महाराजांचे धाकटे चिरंजीव तपोनिधी नारायण महाराज देहूकर यांनी हा वारसा सुरू ठेवला. तुकोबाराय लोप पावल्याच्या ३–४ महिन्यांनी नारायण होईल. यादृष्टीने नारायण महाराजांनी १६२५ महाराजांचा जन्म झाला. नारायण महाराजांना वडील तुकोबाराय यांचे प्रेम आणि सहवास लाभला नाही. त्यामुळे वारीत आपल्याबरोबर संत तुकोबा आणि ज्ञानोबा असावेत, असे अशी त्यांची तीव्र भावना झाली. जेणेकरून पंढरीची वारी अधिक परिपूर्ण आणि भक्तीरसपूर्ण साली ज्येष्ठ वद्य सप्तमी या दिवशी पालखी सोहळा चालू केला. देहूत संत तुकाराम महाराजांच्या पादुका पालखीत घेऊन ते आळंदीला जात. तेथे माऊलीच्या पादुका पालखीत विराजमान करीत.

### छत्रपती संभाजी महाराजांकडून पालखी सोहळ्याला संरक्षण

छत्रपती शिवाजी महाराज यांचे १६८० साली निधन झाले आणि औरंगजेब याने काही लाख मुघल सैनिक घेऊन महाराष्ट्रात परिसीमा पार केल्या होत्या. तेव्हा पालखी सोहळ्यास मुघलांचा काही उपद्रव होऊ नये म्हणून छत्रपती संभाजी महाराजांनी संरक्षण प्रदान केले होते. धर्मवीर संभाजी महाराजांच्या बलिदानानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी देखील संरक्षण पुढे चालू ठेवले होते. आजच्या आधुनिक एकविसाव्या शतकातही एकविसाव्या शतकातही ही परंपरा अखंडपणे चालू असून भाविकांची अलौलिक गर्दी दिसत आहे शासकीय यंत्रणा आपल्या सुयोग्य पद्धतीने वारकऱ्यांची सेवा करत असल्याचे अनेक वर्षापासून दिसत आहे गेली दोन वर्षापासून सरकारने वारकरी सेवेसाठी मार्गात अनेक ठिकाणी मुबलक सुविधा उपलब्ध करून दिले आहेत.



रमेश देशपांडे
९४२३७९३२२६

# प्रेरणादायी अक्षरधन

## यत्न तो देव जाणावा




शेकडो निघतात आनंदाच्या प्रवासाला. त्यातले किती पोहोचतात मुक्कामाला ? का बरेचसे थांबतात मधल्याच गावाला? आनंदग्राम समजून त्याला? की भुलतात कसल्या तरी मोहाला? की कंटाळतात लांबच्या प्रवासाला ?

कदाचित हा आनंदाचा प्रवास नसेलच का आपल्या भाग्यात? हाच विचार करून बरेचसे गर्भगळित होतात. आपल्या दैवाला दोष देतात. वाचलेले सुभाषित आधाराला घेतात. विपत्ती किं विषादेन, संपत्ती हर्षणेन किमकु, भवितव्य भवत्येय, कर्मणो गहना गति।

दैवापुढे देवांचेही चालत नाही. जे व्हायचे तेच होते. कशाला प्रत्येक व्यक्ती उगीच धडपडते? संकटे ओढवून घेते? बसावे घरी असेल. नशिबी तर उभे होईल दारी. वाईट दशा आली तरी दुःख नको. चांगले दिवस दिसले तरी नसता हर्ष नको. व्हायचे ते होत राहते. दैवगती कुणाला कळते? दैवाची तऱ्हा वेगळीच असते. ती उलट्याचे सुलटे आणि फायद्याचे तोट्यात नेते. पाहावी गंमत, होईल तेच, जे दैवाला संमत.

अरे माणसा, पण हा दुबळेपणा, हा काय पुरुषी बाणा ? याला पलायनवादी म्हणा, अरे, धर धैर्य. कर संकटांशी मुकाबला. दैवालाही हाण एक टोला.

एकदा संत एकनाथांनी हिशेब आरंभिला. जमाखर्च तपासला. एक अडका कमी पडला. काय करणार त्याला ? पण जनार्दन स्वामी काय म्हणतील मला? म्हणू देत. होईल तसे, असेल दैवात जसे. पण हा विचार एकनाथांनी लगेच बाजूला सारला. दैवावर का ढकलायचे ? प्रयत्न करायचे. संत महिपती म्हणतात. देवाचा सारोनी नित्य नेम रात्री दीपकासी घातिले भरण। एकनाथ आडका राहिला चुकोन तोचि धुंडोनि पहातसे ।।

पण आनंदाच्या प्रवासाला निघालेले नसतात असे प्रयत्नवादी. मनाची एकतानता व जिद्द नसते हृदयांतरी. दुबळेपणा मानसीचा, रखडतो प्रवास आनंदाचा. थांबतो मध्येच. मग दुःख जिवाला.

एक होता देवदत्त. त्याला जायचे होते ठाण्याहून व्हिटीला. प्रथमच निघाला होता प्रवासाला. रात्रीची वेळ. भय वाटे मनाला. त्याने घेतले दहा मित्र साथीला. एक दोन स्टेशने जाताच काहींना एकदम आठवले, अरे इथे दादरलाच मला महत्त्वाचे काम होते. ते लगेच उतरले. थोडे पुढे जाताच कुणीतरी गाडीत शिरले. ते देवदत्ताच्या उरलेल्या दोस्तांना म्हणाले, 'अरे, किती दिवसांनी भेटलात? मुंबईला केव्हा आलात? आम्ही उतरणार भायखळ्याला. पार्टी ठरलीय आमची. देवदत्ताच्या मित्रांना मोह आवरला नाही. भायखळ्यापुढे जाणे त्यांना शक्यच नाही. ते उतरले भायखळ्याला.

आता देवदत्त एकटा उरला. रात्रीच्या अंधाराला घाबरला. डब्यात एकटा. भीतीच्या भुतांनी मग पछाडले त्याला, कुणीतरी कोपऱ्यात उभा वाटला. तो धावेल आता मला लुटायला. आता धोका माझ्या प्राणाला.

न कळे काय झाले त्याचे? व्हिटीला डबा पोहोचला. तेव्हा कुणीच नाही आढळले त्या डब्यात. प्रवासाच्या शेवटच्या टप्प्यावर डबा रिकामाच. एक चिनी म्हण आहे, शंभर निघतात प्रवासाला. त्यातला क्वचित पोहोचतो मुक्कामाला.

– किशोर गांधी

संकलन: दिशान फिचर्स

## संस्कार सायंबरचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मेडियम स्कूलचा ८वी मध्ये शिकणारा विद्यार्थी संस्कार नितीन सायबर याने महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे च्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (पीएसएस) इ.८वी मध्ये ३०० पैकी २१८ गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे.

शिष्यवृत्ती परीक्षेतील यशाबद्दल संस्थेच्या कार्यवाह छायाताई फिरोदिया, प्राचार्य श्री. भाबड यांनी संस्कार सायंबर याचे अभिनंदन केले. त्याच्या यशाचे श्रेय शाळेचे प्राचार्य व सर्व शिक्षक वृंद तसेच आई डॉ. सौ. स्नेहलता सायंबर, वडील डॉ. नितीन सायंबर यांना जाते. संस्कारला कासवा मॅडमचे मार्गदर्शन लाभले. संस्कार च्या यशामध्ये त्याची बहीण डॉ. संस्कृती सायंबर यांचाही वाटा आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेत 'ज्ञानसाधना गुरुकुल'चे विद्यार्थी नगर जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत

नगर – ज्ञानसाधना बहुउद्देशीय आणि सेवाभावी संस्था संचलित ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेस मधील पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत दोन विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत चमकले असून, १९ विद्यार्थी पात्र झाले असल्याची माहिती संचालक प्रा. प्रसाद जमदाडे यांनी दिली.



ओंकार चेमटे | हेमंत भालेकर

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ साठी क्लासेस मधील इयत्ता ५ वी ८ वी चे मिळून २१ विद्यार्थी बसले होते. त्यांपैकी १९ विद्यार्थी पात्र झाले असून जिल्हा गुणवत्ता यादीत दोन विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. यामध्ये इयत्ता ५ वी चा विद्यार्थी चि. ओंकार नितीन चेमटे आणि इयत्ता ८ वी चा विद्यार्थी चि. हेमंत दीपक भालेकर यांनी अनुक्रमे ५००० रुपये आणि रुपये ७५०० रुपये प्रति वर्ष शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे.

विद्यार्थ्यांना क्लासेस मधील सर्व अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांचे कौतुक करताना प्रा.जमदाडे म्हणाले की, दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश मिळवून आपल्या आईवडिलांचे, शिक्षकांचे आणि क्लासेसचे नाव उंचावले आहे.

## 'एफएमजीई' परीक्षेत डॉ. निकिता जव्हेरी उत्तीर्ण



नगर – भारतात कठीण समजली जाणारी Foreign Medical Graduate Examination (FMGE) परिक्षेमध्ये डॉ. निकिता जव्हेरी या उत्तीर्ण झाल्या आहेत. जॉर्जीयातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर भारतात वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी भारतात वैद्यकीय परीक्षा (FMGE) उत्तीर्ण होणे आवश्यक असते. कठोर मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास यांच्या जोरावर डॉ. निकिता जव्हेरी यांनी हे यश मिळविले आहे. डॉ. निकिता या डॉ. संगीता जव्हेरी व ॲड. संजय जव्हेरी यांच्या कन्या आहे.



तिसगाव येथील श्री वृध्देश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने शिष्यवृत्ती परीक्षेत नेत्रदीपक कामगिरी करणारे विद्यार्थी शिक्षकांसमवेत.

## श्री वृध्देश्वर हायस्कूलचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे तिसगाव येथील श्री वृध्देश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने शिष्यवृत्ती परीक्षेत नेत्रदीपक कामगिरी केली आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये विद्यालयातील पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत १३ विद्यार्थी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत ९ विद्यार्थी पात्र झाले. पाचवीचा विद्यार्थी चि.आठरे नीरज लहानु (२२४ गुण) आणि आठवीचे विद्यार्थी चि.लवांडे महेश कल्याण(गुण २२०) व चि.चेमटे आरव अतुल(गुण २१०) हे तिन्ही विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवून शिष्यवृत्तीधारक झाले आहेत.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा विद्यालयाचे प्राचार्य संजय म्हस्के, उपप्राचार्या सुनिता कवडीवाले व पर्यवेक्षक लहानु ताठे यांनी गौरव केला. विद्यालयात शिष्यवृत्ती, नवोदय, सैनिक स्कूल, एन एम एम एस, ज्ञानवर्धिनी, मंथन अशा वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांसाठी विशेष मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्यांकडून भरपूर सराव करून घेतला जातो व त्यातूनच अशा प्रकारचे यश विद्यार्थी मिळवतात असे यावेळेस प्राचार्य संजय म्हस्के यांनी सांगितले.

या विद्यार्थ्यांना विद्यालयातील शिक्षक रावसाहेब राऊत, किरण दानवे, प्रविण साठे, शैलेश क्षेत्रे, प्रशांत शिंदे, राजेंद्र हंडाळ, प्रेरणा कदम यांचे मार्गदर्शन लाभले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सेक्रेटरी ॲड. विश्वासराव आठरे, सहसेक्रेटरी मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, संस्थेचे सदस्य डॉ. बाळकृष्ण मरकड, काशिनाथ पा. लवांडे, अरविंद आठरे, सरपंच मुनिफा शेख यांनी अभिनंदन केले.

## उज्ज्वल करिअर घडविणे व आत्मनिर्भर होण्यासाठी शिक्षणाचा पाया नक्कीच मदत करेल : सुरेश इथापे

नगर – कोणतेही यश हे सहजासहजी मिळत नाही. त्यासाठी लागणारे समर्पण, शिस्त आणि अखंड अभ्यास विद्यार्थिनींनी दाखवून दिला आहे. आजच्या या डिजिटल युगात मुलींनी प्रत्येक क्षेत्रात आघाडी घेतली आहे. शिक्षणाचा हा पाया तुम्हाला भविष्यात उज्ज्वल करिअर घडवण्यासाठी आणि आत्मनिर्भर होण्यासाठी नक्कीच मदत करेल, असे प्रतिपादन अहिल्यानगर महानगरपालिकेचे अभियंता तथा अतिक्रमण विरोधी पथक प्रमुख सुरेश इथापे यांनी केले.



राधाबाई काळे महिला महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार समारंभामध्ये उपस्थित असलेले शिक्षक व विद्यार्थी.

### राधाबाई काळे महिला महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार समारंभ

प्राचार्य डॉ. शंकर थोपटे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील ज्युनिअर कॉलेजमधील गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार समारंभ प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी सुरेश इथापे यांनी थोरा–मोठ्यांच्या, महापुरुषांच्या त्यागाचे व दूरदृष्टीचे विविध दाखले देऊन विद्यार्थिनी व पालकांना त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक विकासातील योगदानाबद्दल अवगत केले.

यावेळी प्रा. सतीश शिर्के यांनी आपल्या प्रास्ताविकातून महाविद्यालयाच्या विविध शैक्षणिक उपक्रमाची व वाटचालीची माहिती दिली. गुणवंत विद्यार्थिनींच्या कठोर परिश्रमाचे व जिद्दीचे कौतुक केले. आणि त्यांच्या शैक्षणिक वाटचालीस आणि आयुष्यातील प्रत्येक ध्येयासाठी शुभेच्छा दिल्या.

इयत्ता अकरावी प्रथम क्रमांक, बारावी बोर्ड परीक्षेतील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थिनी व MHT-CET परीक्षेतील गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार समारंभ आयोजित केला होता.

याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. भूपेंद्र निकाळजे, विभाग प्रमुख प्रा. अनिल जाधव, विद्यार्थिनी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सावकार हाडुळे यांनी केले. प्रा. सुभाष काळे यांनी आभार मानले.

## एन.एम. फाऊंडेशनतर्फे मोफत वह्यांचे वाटप

नगर – भारताचे शूर, पराक्रमी आणि अद्वितीय वीरपुत्र शहीद अब्दुल हमीद यांची जयंती हा दिवस केवळ एका महान सैनिकाचे स्मरण करण्याचा नसून देशभक्ती, शौर्य, त्याग आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा घेण्याचा दिवस आहे, असे प्रतिपादन प्रमुख पाहुने नगरसेवक शहेबाज हाजी यांनी केले.



एन.एम. फाऊंडेशनतर्फे शहीद अब्दुल हमीद जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले.

मनोगत व्यक्त करताना सय्यद जाहीद म्हणाले की, शहीद अब्दुल हमीद यांनी आपल्या शौर्याने संपूर्ण देशाला अभिमान वाटावा असा इतिहास घडविला. त्यांनी आपल्याला शिकवले की, देशसेवा ही केवळ सैनिकांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे पवित्र कर्तव्य आहे. प्रामाणिकपणे आपले कार्य करणे, समाजात एकता व बंधुभाव जपणे तसेच शिक्षणाच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीत योगदान देणे, हीदेखील खरी देशसेवाच आहे. आजच्या पिढीने मोबाईल आणि सोशल मीडियाच्या आहारी न जाता शहीदांच्या त्यागातून प्रेरणा घेऊन निष्ठा, शिस्त, परिश्रम आणि देशप्रेम ही मूल्ये आपल्या जीवनात रुजवली, तरच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे नमुद केले.

एन.एम. फाऊंडेशन व मखदुम सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने शहीद अब्दुल हमीद यांच्या जयंतीनिमित्त 'मिशन आपुलकी' उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा, दरगाह दायरा येथील विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एसएमसीचे अध्यक्ष सय्यद साबीर होते. प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक शहेबाज हाजी, एन.एम. फाऊंडेशनचे अध्यक्ष शाहिद शाह निजाम सय्यद, जाहीद शाह निजाम सय्यद, उजेर भाई, सय्यद महेमुदमियां, मुख्याध्यापक शेख फैय्याज अब्दुल्ला, नसीम शेख तसेच मखदुम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ताहेरा बागवान यांनी केले. सूत्रसंचालन शिरीन खान यांनी केले. शाकेरा शेख यांनी आभार मानले.

## विद्यार्थ्यांनी अमली पदार्थांपासून दूर राहून उज्ज्वल भविष्य घडवावे

### डॉ. उद्धव शिंदे, 'स्नेहबंध'तर्फे कै. दामोधर विधाते विद्यालय येथे अमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रम

नगर – अमली पदार्थ हे व्यक्ती, कुटुंब आणि समाजासाठी घातक आहेत. विद्यार्थ्यांनी चुकीच्या संगतीपासून दूर राहून शिक्षण, खेळ, संस्कार आणि सकारात्मक विचार यांना प्राधान्य द्यावे. कोणत्याही प्रकारच्या व्यसनाला 'नाही' म्हणण्याची हिंमत प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये असली पाहिजे. व्यसनमुक्त युवकच सशक्त आणि प्रगत भारत घडवू शकतात, असे प्रतिपादन स्नेहबंध सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी केले.



कै. दामोधर विधाते प्राथ.व माध्य. विद्यालय, सारसनगर येथे आयोजित अमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना 'स्नेहबंध'चे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे.

स्नेहबंध सोशल फाऊंडेशन, अहिल्यानगर यांच्या वतीने कै. दामोधर विधाते प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, सारसनगर येथे विद्यार्थ्यांसाठी अमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी डॉ. उद्धव शिंदे यांनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या व्यसनाचे दुष्परिणाम, त्यापासून होणारी शारीरिक, मानसिक व सामाजिक हानी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी म्हस्के तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार मुख्याध्यापक शिवाजी म्हस्के यांनी मानले.



डॉक्टर दिनानिमित्त अनामप्रेम, हिंमतभवन येथे आयोजित सामाजिक उपक्रमात सहभागी अहिल्यानगर डॉक्टर असोसिएशनचे सदस्य व त्यांची मुले.

## डॉक्टर दिनानिमित्त अनामप्रेम येथे सामाजिक उपक्रम

नगर – डॉक्टर दिनानिमित्त शहरातील अहिल्यानगर डॉक्टर असोसिएशनच्या वतीने अनाम प्रेम, हिंमतभवन येथे आयोजित सामाजिक उपक्रम उत्साहात आणि सुंदर पद्धतीने पार पडला. या वेळी संघटनेच्या वतीने संस्थेतील मुलांना जेवण देण्यात आले तसेच संस्थेला वैद्यकीय साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाला संघटनेचे डॉ. अभिजीत बोरूडे, डॉ. वैभव ठुबे, डॉ. दीपक कारखेले, डॉ. किरण कर्डिले, डॉ. प्रशांत सुरकुटला, डॉ. गणेश गावडे, डॉ. निशांत गरूड, डॉ. विकी गांधी, डॉ. सौ. कर्डिले, सौ. मिनाक्षी गावडे, डॉ.सुरेंद्र खोपे यांच्यासह सदस्य उपस्थित होते.

यावेळी डॉ. अभिजीत बोरुडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी संघटनेच्या सदस्यांच्या घरातील लहान मुलांचीही विशेष उपस्थिती होती. त्यांना या सामाजिक उपक्रमाचा आगळा वेगळा अनुभव मिळाला.

अनामप्रेम संस्थेचे अध्यक्ष श्री. माने आणि संस्थेच्या संचालिका डॉ. मराठे यांनी डॉक्टर असोसिएशनच्या या सामाजिक उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमात डॉ. प्रशांत सुरकुटला आणि डॉ. अभिजीत बोरूडे यांनी मनोगत व्यक्त केले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमधील सेवाभाव रूग्णांसाठी वरदान

### मंगेश चिवटे यांचे प्रतिपादन

नगर – अहिल्यानगर शहरात जैन सोशल फेडरेशन आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून रूग्णसेवा महायज्ञ अखंडपणे चालवत आहे. अल्प दरात आणि वेळ प्रसंगी मोफत मिळणारे दर्जेदार उपचार सर्वसामान्य रूग्णांसाठी वरदान ठरत आहेत. येथील वैद्यकीय उपचारांमध्ये सेवाभाव असल्याने राज्यभरातील रूग्ण विश्वासाने याठिकाणी येतात. येथील जागतिक दर्जाचे वैद्यकीय उपकरणे, तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टरांची टिम, तत्पर स्टाफ यामुळे रूग्णांना दिलासा मिळतो. येथील रूग्णांना हिप व गुडघे या सांधेबदल शस्त्रक्रियांसाठी संतोष बोथरा यांच्या आग्रहानुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षामार्फत मदत मिळावी यासाठी आवर्जून प्रयत्न करू, अशी ग्वाही मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे माजी अध्यक्ष तथा शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे अध्यक्ष मंगेश चिवटे यांनी दिली. यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे नुकतेच मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करण्यात आले.

आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे नुकतेच मोफत कॅन्सर तपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी शिवसेनेचे सचिव राम रेपाळे, मंगेश चिवटे, शिवसेनेचे अहिल्यानगर येथील पदाधिकारी, जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, डॉ.वसंत कटारिया, प्रशासन अधिकारी डॉ.आशिष भंडारी आदी उपस्थित होते.

स्वागत करताना संतोष बोथरा म्हणाले की, हॉस्पिटलच्या माध्यमातून प्रत्येक रूग्णाला माफक दरात उच्च दर्जाच्या उपचार सुविधा देण्यात येतात. शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ रूग्णांना मिळवून दिला जातो. शासनाच्या योजनांसाठी मंगेश चिवटे यांनी सातत्याने हॉस्पिटलला सहकार्य केले आहे. त्यांच्या माध्यमातून सांधेबदली शस्त्रक्रियाच्या रूग्णांनाही शासनाकडून मदत मिळेल असा विश्वास आहे.

राम रेपाळे म्हणाले, राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांचे नाव असलेल्या या हॉस्पिटलमधील सेवा कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे. वर्षभर विविध शिबिरांच्या माध्यमातून रूग्णांची तपासणी व माफक दरात उपचार केले जातात. याचा राज्यातील रूग्णांना लाभ होतो. सुसज्ज नेत्रालयातूनही दृष्टीदोष निर्मूलनाचे मोठे कार्य होत आहे. अशा सेवाभावी आरोग्य सेवेचा इतरांनीही आदर्श घेतला पाहिजे.

डॉ.आशिष भंडारी यांनी आभार मानले.

# पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज

### माजी प्राचार्य खासेराव शितोळे

नगर – पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे ऋतुमानात मोठ्या प्रमणात बदल होत असून अवेळी पाऊस, कोणत्याही ऋतूत ऊन, वारा, थंडी व पावसाचे असंतुलित चक्र अनुभवास येत आहे. याचा मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने सामाजिक बांधिलकी जपत निसर्गावर प्रेम करणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन माजी प्राचार्य खासेराव शितोळे यांनी केले. ॲड. युवराज शिंदे हे अनेक वर्षांपासून कल्याण रोड परिसरात विविध सामाजिक उपक्रम राबवत असून त्यांनी हाती घेतलेला वृक्षारोपण व संवर्धनाचा उपक्रम कौतुकास्पद आहे. पुढील पिढ्यांच्या भविष्यासाठी चांगले कार्य उभे करणे आवश्यक असून वाढते तापमान व महानगरांतील वायुप्रदूषणाचा विचार करता वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज बनली आहे. वृक्ष आपल्याला चोवीस तास मोफत प्राणवायू देतात, असे त्यांनी सांगितले.



कल्याण रोड येथील फॅमिली विश्व मॉललगतच्या डीपी रस्त्यावर ॲड. युवराज शिंदे यांच्या सहकार्याने वृक्षारोपणाचा उपक्रम पार पडला. (छायाचित्र : लहू दळवी)

### फॅमिली विश्व मॉल डीपी रस्त्याच्या दुभाजकामध्ये ॲड. युवराज शिंदे यांच्या सहकार्यातून वृक्षारोपण

कल्याण रोड येथील फॅमिली विश्व मॉललगतच्या डीपी रस्त्यावर ॲड. युवराज शिंदे यांच्या सहकार्याने वृक्षारोपणाचा उपक्रम पार पडला.

ॲड. युवराज शिंदे म्हणाले की, कल्याण रोड परिसराच्या विकासासाठी आमदार संग्राम जगताप व डॉ. सुजय विखे पाटील यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यातून या भागासाठी मोठा निधी उपलब्ध झाला असून मूलभूत प्रश्नांसह विविध विकासकामे मार्गी लावण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. कल्याण रोड हे विकसित उपनगर व्हावे यासाठी प्रयत्न सुरू असून वृक्षारोपण व संवर्धन ही लोकचळवळ व्हावी, यासाठी सर्वांना सोबत घेऊन 'हरित कल्याण रोड' निर्माण करण्याचे काम हाती घेतले जाईल. सण, उत्सव व वाढदिवस साजरे करताना सकारात्मक दृष्टिकोन ठेवून सामाजिक बांधिलकी जपणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

पारुनाथ ढोकळे म्हणाले की, ॲड. युवराज शिंदे हे कोणतेही पद नसतानाही कल्याण रोड परिसराच्या विकासासाठी सातत्याने कार्यरत असून जनतेचे छोटे–मोठे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतात. त्यांनी सुरू केलेले वृक्षारोपण व संवर्धनाचे कार्य कौतुकास्पद आहे.

प्रा. भगवानराव काटे यांनीही वृक्षारोपणाचे महत्त्व विशद केले.

या प्रसंगी माजी प्राचार्य खासेराव शितोळे, आयोजक ॲड. युवराज शिंदे, पारुनाथ ढोकळे, प्रा. भगवान काटे, एल. बी. म्हस्के, शिवाजी शिंदे, राजेंद्र शिंदे, देवा होले, अरुण ढाकणे, संभाजी चौधरी, गणेश बेरड, शेषराव आगळे, शंकर शिरसुल, सतीश लगड, पंडित हराळ, बाबासाहेब आंधळे, केशव चेमटे, सुधाकर बोल्ली, दत्तात्रेय मित्याल, पुंडलिक आरवडे, किशोर नावकार, रोहित काळोखे, विवेक खोसे, कोरडे सर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संभाजी चौधरी यांनी केले. शिवाजी शिंदे यांनी आभार मानले.

# अहिल्यानगरमध्ये रंगणार 'इतिहास महाराष्ट्राचा' महोत्सव

### बालकलाकारांच्या कलाविष्कारातून उलगडणार पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा इतिहास!

नगर – अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेशी संलग्न असलेल्या 'बालरंगभूमी परिषद' अंतर्गत यावर्षी 'इतिहास महाराष्ट्राचा २०२६' या विशेष महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जाज्वल्य जीवनकार्यावर, शौर्यावर आणि प्रेरणेवर आधारित एकपात्री, नाट्यछटा, स्वगत, नाट्य, नृत्य आणि संगीत सादरीकरण स्पर्धा पार पडणार आहे. हा महोत्सव प्रामुख्याने दोन फेऱ्यांमध्ये विभागला गेला असून, बाल मनांमध्ये महाराष्ट्राचा इतिहास आणि संस्कृती रुजविणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. प्राथमिक फेरी स्थानिक शाखास्तरावर आयोजित केली जाईल तर अंतिम फेरी ९ ऑगस्ट रोजी माऊली नाट्यगृह, अहिल्यानगर येथे होईल.

स्पर्धेचे वयोगट आणि नियम: एकल गट क्र. १: वय वर्षे ५ ते १० पर्यंत (सादरीकरण वेळ: जास्तीत जास्त ५ मिनिटे)., एकल गट क्र. २: वय वर्षे ११ ते १५ पर्यंत (सादरीकरण वेळ: जास्तीत जास्त ५ मिनिटे)., समूह गट: वय वर्षे ५ ते १५ पर्यंत. या गटात रंगमंचावर किमान ४ आणि कमाल ८ बालकलाकार असणे बंधनकारक आहे (सादरीकरण वेळ: जास्तीत जास्त ८ मिनिटे).

प्राथमिक व अंतिम फेरीतील सर्व सहभागी आणि विजेत्या स्पर्धकांना/संघांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येईल. अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या बालकलाकारांना नियमांनुसार मध्यवर्तीकडून प्रवासखर्च दिला जाईल, तसेच त्यांच्या दुपारच्या भोजनाची व्यवस्था केली जाईल. महाराष्ट्राची समृद्ध नाट्यसंस्कृती अनुभवण्यासाठी आणि अहिल्यादेवींच्या पराक्रमाला मानवंदना देण्यासाठी या महोत्सवात बालकलाकारांनी सहभागी व्हावे, अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी प्रसाद भणगे ९२२५३१६६१५ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन बालरंगभूमी परिषदेतर्फे करण्यात आले आहे.

# राजमाता जिजाऊंना अनोखे अभिवादन! ३२ ज्येष्ठांना मिळाली नवदृष्टी; अवयवदानाचा घेतला संकल्प

### फिनिक्स सोशल फाऊंडेशनचा उपक्रम; मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेतून ज्येष्ठांच्या आयुष्यात पुन्हा उजेड

नगर – छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याच्या प्रेरणेतून आणि राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधत फिनिक्स सोशल फाऊंडेशनने राबविलेल्या मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया उपक्रमामुळे तब्बल ३२ ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यात पुन्हा एकदा प्रकाश फुलला आहे. पुणे येथील रुग्णालयात यशस्वी शस्त्रक्रिया झाल्यानंतर हे सर्व ज्येष्ठ नागरिक नुकतेच अहिल्यानगरात परतले. शहरात आगमन होताच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर 'जय भवानी... जय शिवाजी'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. नव्याने मिळालेल्या दृष्टीबद्दल कृतज्ञता व्यक्त करत या ज्येष्ठांनी अवयवदानाचा संकल्प केला.

शहरात परतल्यानंतर फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांच्या हस्ते सर्व ज्येष्ठ नागरिकांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर प्रथमच स्पष्टपणे जग पाहण्याचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर झळकत होता. अनेकांनी आपल्या भावना व्यक्त करत, फिनिक्स फाऊंडेशनने आमच्या आयुष्यात पुन्हा प्रकाश आणला. आता आम्ही नव्या उत्साहाने जीवन जगू शकतो, अशा शब्दांत कृतज्ञता व्यक्त केली.



'फिनिक्स'च्या माध्यमातून नवदृष्टी मिळालेल्या ज्येष्ठ नागरिकांसमवेत नेत्रदूत जालिंदर बोरुडे आदी.

समाजसेवेचा वेगळा आदर्श निर्माण करणाऱ्या फिनिक्स सोशल फाऊंडेशनने महापुरुषांच्या जयंती आणि पुण्यतिथी केवळ औपचारिक कार्यक्रमांनी नव्हे, तर प्रत्यक्ष समाजोपयोगी उपक्रमांद्वारे साजऱ्या करण्याची परंपरा जपली आहे. याच परंपरेचा भाग म्हणून राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतिदिनी गरजू, उपेक्षित आणि दृष्टीदोषाने त्रस्त नागरिकांना नवदृष्टी देण्याचा उपक्रम राबविण्यात आला.

फाऊंडेशनच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी शिबिरामध्ये शेकडो नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली होती. या तपासणीत मोतीबिंदू झालेल्या ३२ ज्येष्ठ नागरिकांची निवड करण्यात आली. त्यानंतर पुणे येथील के. के. आय. बुधराणी रुग्णालयात त्यांच्यावर पूर्णपणे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या. रुग्णांचा प्रवास, नेत्रतपासणी, शस्त्रक्रिया, औषधे, निवास तसेच इतर आवश्यक वैद्यकीय सुविधा पूर्णतः विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आल्या.

याबाबत जालिंदर बोरुडे म्हणाले की, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अनेक नागरिक केवळ पैशाअभावी आवश्यक उपचार घेऊ शकत नाहीत. विशेषतः मोतीबिंदूसारख्या आजारामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांचे दैनंदिन जीवन अत्यंत कठीण बनते. अशा गरजू नागरिकांना पुन्हा दृष्टी मिळवून देण्याच्या उद्देशाने फिनिक्स सोशल फाऊंडेशनने जिल्हाभर 'दृष्टीदान'ची व्यापक चळवळ सुरू केली आहे. ते पुढे म्हणाले, राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेचे संस्कार दिले. समाजहित, रयतेचे कल्याण आणि सेवाभाव हीच त्यांची खरी शिकवण होती. त्याच विचारांचा वारसा जपत फिनिक्स सोशल फाऊंडेशन समाजातील गरजू, उपेक्षित आणि वंचित घटकांसाठी सातत्याने आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवत आहे.

फाऊंडेशनच्या माध्यमातून दर महिन्याला मोफत नेत्र तपासणी शिबिरे, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरे तसेच नेत्रदान आणि अवयवदानाबाबत जनजागृती मोहिमा राबविण्यात येतात. या उपक्रमांमुळे अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळत असून समाजात आरोग्याविषयी जागरूकता वाढत आहे. यावेळी नवदृष्टी लाभलेल्या ज्येष्ठ नागरिकांनी अवयवदानाचा संकल्प करत, आपल्याला समाजाकडून जे मिळाले, त्याची परतफेड समाजालाच करायची, अशी भावना व्यक्त केली. त्यामुळे राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतिदिनी झालेला हा उपक्रम सामाजिक बांधिलकी, सेवाभाव आणि मानवतेचा संदेश देणारा ठरला.


नोंदणी क्रमांक :– एनएसके/एएनआर/जीएनएल/(सी)/५०३६/२०१९ दिनांक:–०१–०३–२०१९

रजि.पोहोच पावतीसह/समक्ष बजावणी/डकावणीने

**"महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) व नियम १९६१ चे नियम १०७ (३) कायद्यान्वये**

**नाशिक विभागातील नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांचे फेडरेशन मर्या., अहिल्यानगर द्वारा**

**मुख्य कार्यालय :– फ्लॅट नं.०४, साक्षी चेंबर्स, कोर्ट गल्ली, अहिल्यानगर ४१४ ००१**

जाक्र./रिकव्हरी/एस.आर.ओ./१५६/११३/२०२६–२७ दिनांक:– ०१/०७/२०२६

**स्थावर मालमत्ता ताबा घेण्याबाबतची नोटीस**

**नमुना 'झेड' (नियम १०७ पोट – नियम (११ (ड–१)**

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्यादित अहिल्यानगर, मुख्य कार्यालय :– बागडपट्टी, ता.नगर जि. अहिल्यानगर व्दारा :– नाशिक विभागातील नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांचे फेडरेशन मर्या., अहिल्यानगर महाराष्ट्र सह. संस्था नियम १९६१ अन्वये असून मागणीची नोटीस ऋणको यांना देऊन नोटीसीमध्ये नमूद केलेली रक्कम सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको यांनी रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. खाली सही करणाऱ्याने जप्तीची नोटीस दिलेली असून, पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात करण्यात येणार आहे. ऋणकोने रक्कमेचा जमा/भरणा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोल याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे. आणि सर्व नागरिकांना खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) व नियम १९६१ चे नियम १०७ (३) कायद्यान्वये'' (नियम १०७ पोट–नियम (११(ड–१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दि. ०१/०८/२०२६ दिवशी ताबा घेतला जाईल. विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे कि, सदर मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये. व तसा व्यवहार केल्यास : लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्यादित अहिल्यानगर, मुख्य कार्यालय :– बागडपट्टी, ता.नगर जि. आहिल्यानगर द्वारा यांच्या बोजाची रक्कम आणि होणारे व्याज या संस्थेला आधीन राहावे लागेल.

**–: स्थावर मालमत्तेचे वर्णन :–**

| अ. क्र. | थकबाकीदारांचे नावे | दाखला क्र. व थकबाकी रक्कम | नोटीस दिनांक | गावाचे नाव | गट क्र. भूमापन क्र. | क्षेत्र हे.आर चौ.मी | चतु:सिमा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **कर्जदार श्री/सौ. नितीन चंद्रकांत शेलार**<br>मु. पो.:– राहुल बाजार, भिंगारदिवे मळा, भूतकरवाडी, नगर ता.नगर जि.अ.नगर<br>**१.१) जामीनदार श्री/सौ.:–दिलीप लक्ष्मण गायकवाड**<br>मु.पो.:– राजदीप अपार्टमेंट, बोरुडे मळा, अ.नगर, ता.नगर जि.अ.नगर<br>**१.२) जामीनदार श्री/सौ. :- असिफ मोगल मणियार (इनामदार)**<br>मु.पो. शुक्रवार बाजार, भिंगार, नगर, ता.नगर, जि.अ.नगर | दाखला क्र.<br>५६४/२०१३<br>थकबाकी रक्कम<br>२६,२४६.०० | जंगम/स्थावर मागणी मालमत्ता जप्ती पूर्वीची नोटीस दि.–०१६/०१/२०२४ व जंगम जप्ती आदेश दिनांक : ०६/०२/२०२४ स्थावर मालमत्ता जप्ती पूर्वीची दि.– २४/०२/२०२५ व स्थावर जप्ती आदेश दि. १५/०३/२०२५ | चाहूराणा बु.अहिल्यानगर | गट क्र. ११७/४<br>खाते क्र. १७१५७<br>प्लॉट नं.०१<br>फ्लॅट नं.०२ | ०.००.००१<br>पैकी | मूळ नकाशाप्रमाणे |
| २ | **कर्जदार श्री/सौ : जाधव राजेंद्र काळू**<br>मु. पो.:– प्लॉट नं.०३, प्रबोधन सोसा. बुरुडगाव रोड, नगर ता.नगर जि.अ.नगर<br>**१)जामीनदार श्री/सौ.: आचार्य अरविंद भाऊसाहेब**<br>मु.पो.:– आनंद नगर स्टेशन रोड, अ.नगर ता.नगर, जि.अ.नगर<br>**१.२) जामीनदार श्री/सौ. : लोंढे रवींद्र भालचंद्र**<br>मु.पो. रवीसदन गुलाबसिंग कंपाउंड, कोठी, स्टेशन रोड, नगर, ता.नगर जि.अ.नगर | दाखला क्र.<br>७४/२०२५–२६<br>दावा रक्कम<br>९९,०६८.०० | जंगम/स्थावर मागणी मालमत्ता जप्ती पूर्वीची नोटीस दि.–०१/०७/२०२५ व जंगम जप्ती आदेश दिनांक : ०७/०८/२०२५ स्थावर मालमत्ता जप्ती पूर्वीची दि.– ३०/०८/२०२५ व स्थावर जप्ती आदेश दि. २४/१०/२०२५ | पाथरे खुर्द ता.राहुरी जि.अ.नगर | गट क्र. १७६/१<br>खाते क्र. १८९२ | ०.०५.००<br>पैकी | मूळ नकाशाप्रमाणे |

दिनांक : ०१/०७/२०२६,
स्थळ : अहिल्यानगर

**विशेष वसूली व विक्री अधिकारी**
**"महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१ व नियम १९६१ चे नियम १०७ (३)कायद्यान्वये"**
**द्वारा:– लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्या., अहिल्यानगर**


# जिल्ह्यात अपघात रोखण्यासाठी प्रशासन 'ॲक्शन' मोडमध्ये

### शिवसेनेचे अभिजीत पोटे यांनी मांडलेल्या समस्यांवरही कारवाईचे आदेश

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत विविध निर्णय घेण्यात आले. जिल्ह्यातील अपघात वळण ठिकाणे, अतिक्रमण, धोकादायक चौक, ब्लॅकस्पॉट, अपूर्ण सुरक्षा उपाययोजना तसेच राष्ट्रीय व राज्य महामार्गांवरील त्रुटी दूर करण्यासाठी संबंधित विभागांना तातडीने कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले. बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेनेचे अभिजीत पोटे यांनी जिल्ह्यातील रस्ता सुरक्षेशी संबंधित अनेक प्रश्न उपस्थित केले. प्रवरा संगम परिसरातील अपघात वळण डिव्हायडर, रिफ्लेक्टर बोर्ड, झाडांच्या फांद्यांमुळे निर्माण होणारा धोका, टोल नाक्यांवरील वाहतूक कोंडी, पुणे–अहिल्यानगर महामार्गावरील अतिक्रमण, बेकायदा पार्किंग, शहरातील वाहतूक कोंडी, पादचारी सुरक्षेचा प्रश्न, छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील धोकादायक ठिकाणे तसेच पुलांवरील सुरक्षेच्या उपाययोजनांची आवश्यकता याकडे प्रशासनाचे लक्ष वेधले.



अहिल्यानगर जिल्ह्यातील वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत विविध निर्णय घेण्यात आले.

अभिजीत पोटे यांनी मांडलेल्या मुद्द्यांची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी संबंधित विभागांना तातडीने आवश्यक उपाययोजना करून निश्चित कालावधीत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.

बैठकीत एमआयडीसी येथील अपूर्ण फ्लायओव्हरचे काम पूर्ण करणे, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार रस्ता सुरक्षा उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी, राष्ट्रीय व राज्य महामार्गांवरील ब्लॅकस्पॉट दुरुस्त करणे, अतिक्रमण हटविणे, दिशादर्शक फलक, रिफ्लेक्टर, स्पीड ब्रेकर, झाडांच्या फांद्यांची छाटणी, विद्युत खांबांचे स्थलांतर तसेच बेकायदा पार्किंगवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले.

बैठकीस शिवसेनेचे बाळासाहेब कदम, संजय वाघ अदीसह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी रस्ता सुरक्षेबाबत कोणतीही हयगय सहन केली जाणार नसून, प्रत्येक विभागाने जबाबदारीने काम करून निश्चित मुदतीत कार्यवाहीचा अहवाल सादर करावा, असे स्पष्ट निर्देश दिले. तसेच अभिजीत पोटे यांनी उपस्थित केलेल्या रस्ता सुरक्षेच्या प्रश्नांवर प्राधान्याने कार्यवाही करण्याचे आदेशही बैठकीत देण्यात आले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## 'युरोपा' वरील 'कोळ्या'चे गूढ उकलले

आपल्या ग्रहमालिकेतील सर्वात मोठा ग्रह गुरूचा चौथा सर्वात मोठा चंद्र असलेल्या 'युरोपा'वर गेल्या ३० वर्षांपासून शास्त्रज्ञांना कोड्यात टाकणा?या एका कोळीसदृश रचनेचे रहस्य अखेर उलगडले आहे. या विचित्र आकृतीला आता 'दामन एल्ला' असे नाव देण्यात आले असून, आयरिश भाषेत याचा अर्थ 'कोळी' किंवा 'भिंतीवरील राक्षस' असा होतो.



मार्च १९९८ मध्ये नासाच्या 'गॅलिलिओ' अंतराळयानाने युरोपाच्या पृष्ठभागाचे फोटो टिपले होते. यामध्ये 'मन्नान क्रेटर' नावाच्या एका विवराच्या मध्यभागी झाडाच्या फांद्यांसारखा किंवा कोळ्याच्या जाळ्यासारखा एक गडद आकार दिसला होता. सुमारे १३.७ मैल (२२ कि.मी.) रुंद असलेल्या या संरचनेबद्दल शास्त्रज्ञांमध्ये अनेक दशकांपासून मतभेद होते. सुरुवातीला हा आकार गुरू ग्रहाच्या गुरुत्वाकर्षणामुळे पडलेल्या भेगा असाव्यात किंवा युरोपाच्या गर्भातील महासागरातून होणाऱ्या ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे तयार झाला असावा, असे मानले जात होते.

'द प्लॅनेटरी सायन्स जर्नल' मध्ये २ डिसेंबर रोजी प्रसिद्ध झालेल्या एका नवीन अभ्यासात शास्त्रज्ञांनी वेगळाच दावा केला आहे. संशोधकांच्या मते, ही रचना पृथ्वीवरील गोठलेल्या तलावांवर तयार होणाऱ्या 'लेक स्टार्स' प्रमाणे तयार झाली असावी. पृथ्वीवर जेव्हा गोठलेल्या तलावावर बर्फ पडतो, तेव्हा बर्फाच्या थरातील छोट्या छिद्रांमधून पाणी वर येते आणि अशा नक्षीदार आकृत्या तयार होतात. संशोधकांनी प्रयोगशाळेत ही प्रक्रिया पुन्हा करून पाहिली आणि त्यांना युरोपावरील आकृतीशी जुळणारे निकाल मिळाले.

शास्त्रज्ञांच्या मते, ही प्रक्रिया खालील टप्प्यांत घडली असावी : युरोपाच्या पृष्ठभागावर मन्नान क्रेटर तयार झाल्यानंतर, तिथे एखाद्या मोठ्या लघुग्रहाचा आघात झाला असावा. या आघातामुळे चंद्राच्या बफार्ळ कवचाला एक बारीक तडा गेला. या तड्यावाटे युरोपाच्या अंतरंगातील खारट पाणी वर आले आणि पृष्ठभागावर पसरले. हे पाणी गोठताना त्यातून कोळीसदृश 'दामन एल्ला'ची निर्मिती झाली. युरोपा हा चंद्र सौरमालेतील अशा ठिकाणांपैकी एक मानला जातो, जिथे परग्रहीय जीवसृष्टी असण्याची शक्यता सर्वाधिक आहे. या नवीन शोधामुळे तेथील भूगर्भीय घडामोडी समजून घेण्यास मोठी मदत होणार आहे.

## फ्रॉड कॉल्सना पूर्णविराम




तुम्ही सुद्धा वारंवार येणाऱ्या विमा पॉलिसीच्या कॉल्समुळे किंवा अनोळखी फसव्या फोनमुळे त्रस्त आहात का? तर तुमच्यासाठी एक दिलासादायक बातमी आहे. टेलिकॉम रेग्युलेटरी अथॉरिटी ऑफ इंडिया (TRAI)) ने बनावट कॉल्स आणि फ्रॉड रोखण्यासाठी एक मोठे पाऊल उचलले आहे. आता सर्व विमा कंपन्यांना त्यांचे सर्व्हिस आणि ट्रांझॅक्शन कॉल्स करण्यासाठी '१६००' ने सुरू होणारी नंबर सीरिज वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे.

ट्रायच्या नवीन आदेशानुसार, खठउअख (भारतीय विमा विनियामक आणि विकास प्राधिकरण) अंतर्गत येणाऱ्या सर्व विमा कंपन्यांना आता त्यांच्या ग्राहकांशी संपर्क साधण्यासाठी १० अंकी मोबाईल नंबरऐवजी १६०० ने सुरू होणारी विशेष सीरिज वापरावी लागेल. या बदलासाठी कंपन्यांना १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. यामुळे फोन उचलण्यापूर्वीच स्क्रीनवर १६०० ही सीरिज दिसेल, ज्यामुळे कॉल खरोखरच विमा कंपनीचा आहे की फेक, हे समजणे सोपे होईल. बहुतेक फ्रॉड प्रकरणांमध्ये भामटे १० अंकी मोबाईल नंबरवरून फोन करून स्वतःला इन्शुरन्स एजंट भासवतात.

नवीन नियमानंतर अशा बनावट कॉल्सवर आळा बसेल. कोणत्याही थर्ड-पार्टी ॲपशिवाय (उदा. ट्रूकॉलर) सामान्य माणूस कॉलची ओळख पटवू शकेल. वैयक्तिक कॉल्स आणि बिझनेस कॉल्स यातील फरक स्पष्ट होईल, ज्यामुळे लोकांची दिशाभूल होणार नाही. TRAI ने केवळ विमा क्षेत्रासाठीच नाही, तर ठइख (बँकिंग), डएइख (शेअर बाजार) आणि PFRDA शी संबंधित संस्थांसाठीही हा नियम आधीच अनिवार्य केला आहे.

दूरसंचार विभागाने (DoT) विशेषतः बँकिंग, वित्तीय सेवा आणि विमा (BFSI) क्षेत्रासाठी १६०० सीरिज राखून ठेवली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आतापर्यंत ५७० हून अधिक मोठ्या संस्थांनी ही नवीन सीरिज स्वीकारली असून, ३००० पेक्षा जास्त नंबर जारी करण्यात आले आहेत. यामुळे येणाऱ्या काळात सायबर फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठी घट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## इथे थबकला काळ...



बदलत्या काळात गावे शहरात रूपांतरित होतात किंवा नवी वस्ती उभी राहते; मात्र ब्रिटनच्या डॉर्सेटमधील 'टाईनहम' हे गाव याला अपवाद आहे. या गावात पाऊल ठेवताच जणू काही काळ ८० वर्षे मागे गेला आहे, असा भास होतो. हे केवळ एक ओसाड गाव नसून, एका मोठ्या बलिदानाची आणि अधुऱ्या राहिलेल्या आशेची जिवंत साक्ष आहे.

टाईनहम गावासाठी १९४३ हे वर्ष निर्णायक ठरले. दुसऱ्या महायुद्धाचा काळ होता आणि ब्रिटिश सैन्याला प्रशिक्षणासाठी सुरक्षित जागेची गरज होती. टाईनहमची भौगोलिक स्थिती 'लुलवर्थ फायरिंग रेंज'च्या जवळ असल्याने सैन्याने हे गाव आपल्या ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला. लष्कराच्या एका आदेशाने शेकडो लोकांचे आयुष्य कायमचे बदलून टाकले. पिढ्यान्पिढ्या राहणाऱ्या या गावकऱ्यांना त्यांचे घर सोडण्यासाठी लष्कराने केवळ एक महिन्याची नोटीस दिली होती. युद्ध संपल्यावर आपण पुन्हा आपल्या घरी परतू, या आशेने गावकऱ्यांनी जड अंतःकरणाने गाव सोडले.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि लष्कराच्या मदतीसाठी त्यांनी दिलेला हा कौतुकास्पद प्रतिसाद होता; पण हा निरोप कायमचा असेल याची पुसटशी कल्पनाही त्यांना नव्हती. गावातील चर्चच्या दरवाज्यावर गावकऱ्यांनी जाताना एक संदेश लिहून ठेवला होता, जो आजही वाचणाऱ्याचे डोळे ओलावतो. त्या संदेशात लिहिले होते: 'आम्ही आमची घरे देशाच्या स्वातंत्र्यासाठी सोडत आहोत. आम्ही एक दिवस नक्की परत येऊ. कृपया आमच्या घरांची आणि गावांची काळजी घ्या.' हा संदेश आजही त्या तुटलेल्या विश्वासाची आणि अपूर्ण राहिलेल्या परतीच्या प्रवासाची कथा सांगतो.

युद्ध संपले, पण सरकार आणि लष्कराने हे गाव कायमस्वरूपी 'सैन्य प्रशिक्षण क्षेत्र' म्हणून घोषित केले. त्यामुळे गावकऱ्यांचे घराकडे परतण्याचे स्वप्न कायमचे भंग पावले. ८० वर्षांनंतरही हे गाव १९४३ मध्ये जसे होते, तसेच जपून ठेवण्यात आले आहे. दगडी घरे, शाळेच्या खोल्या आणि चर्च आजही तिथे उभे आहेत. वर्षातील काही ठरावीक दिवसांसाठी हे गाव पर्यटकांसाठी खुले केले जाते. जेव्हा पर्यटनाची वेळ संपते, तेव्हा गावाचे गेट बंद केले जातात, जणू काळाला पुन्हा टाळे लावले जाते!

## चिंता पेंग्विनच्या शिकारीची

निसर्गाच्या साखळीत एखादा बदल झाला की, त्याचे परिणाम किती अनपेक्षित असू शकतात, याचे एक उत्तम उदाहरण अर्जेंटिनामधील 'पॅटागोनिया' भागात पाहायला मिळत आहे. येथील 'माँटे लिओन नॅशनल पार्क'मध्ये प्युमा या हिंस्र मार्जार प्रजातीने चक्क पेंग्विनची शिकार करण्यास सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे, या अन्नामुळे नेहमी एकटे राहणारे हे प्युमा आता एकमेकांसोबत मिळून-मिसळून राहू लागले आहेत, असा निष्कर्ष एका नवीन संशोधनातून समोर आला आहे.



बुधवारी (१७ डिसेंबर) 'प्रोसिडिंग्ज ऑफ द रॉयल सोसायटी बी' मध्ये प्रसिद्ध झालेल्या या शोधनिबंधातून ही अनोखी माहिती समोर आली आहे. २० व्या शतकात मेंढीपालन करणाऱ्या शेतकऱ्यांनी प्युमांना या भागातून हुसकावून लावले होते. २००४ मध्ये जेव्हा 'माँटे लिओन नॅशनल पार्क'ची स्थापना झाली, तेव्हा प्युमा हळूहळू या भागात परतले. मात्र, त्यांच्या अनुपस्थितीत येथील परिसंस्था बदलली होती. समुद्रातील बेटांवर राहणारे 'मॅगेलॅनिक पेंग्विन' आता जमिनीवर वस्ती करून राहू लागले होते. तिथे पेंग्विनच्या सुमारे ४०,००० जोड्यांची प्रजनन वसाहत तयार झाली होती. प्युमा परतल्यानंतर त्यांनी या बदललेल्या परिस्थितीचा फायदा घेण्यास सुरुवात केली.

शास्त्रज्ञांना सुरुवातीला वाटले की, एखादा-दुसरा प्युमा पेंग्विनची शिकार करत असेल. मात्र, संशोधनादरम्यान पेंग्विन वसाहतीजवळ मोठ्या संख्येने प्युमा वावरत असल्याचे दिसून आले. २०१९ ते २०२३ दरम्यान शास्त्रज्ञांनी १४ प्युमांना 'जीपीएस कॉलर' लावून त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवले. यापैकी ९ प्युमांनी नियमितपणे पेंग्विनची शिकार केली, तर ५ प्युमांनी शिकारीसाठी इतर प्राण्यांची निवड केली. नेहमी एकमेकांपासून दूर राहणारे प्युमा पेंग्विनच्या वसाहतीजवळ एकमेकांच्या अस्तित्वाचा स्वीकार करत असल्याचे आणि अधिक सामाजिक झाल्याचे दिसून आले.

न्यू जर्सी येथील 'ड्यूक फार्म्स'मधील पर्यावरणशास्त्रज्ञ आणि अभ्यासाचे सह-लेखक मिचेल सेरोटा म्हणाले, 'आजच्या बदललेल्या वातावरणात वन्यजीवांचे पुनर्वसन करणे म्हणजे केवळ जुनी परिसंस्था परत मिळवणे नव्हे. यामुळे प्राणी आणि त्यांच्या वर्तनामध्ये पूर्णपणे नवीन आणि अनपेक्षित बदल घडून येऊ शकतात.' हा शोध दर्शवतो की, जेव्हा शिकारी प्राणी त्यांच्या जुन्या अधिवासात परततात, तेव्हा त्यांना मिळालेले नवीन खाद्य त्यांच्या सामाजिक रचनेत आणि वागणुकीतही बदल घडवून आणू शकते.

## लाल झाला समुद्रकिनारा!

इराणच्या होर्मुझ बेटाच्या किनाऱ्यांनी पुन्हा एकदा एका अलौकिक बदलाने जगाला आश्चर्यचकित केलं आहे. मुसळधार पावसानंतर, बेटाचे किनारे आणि किनारी पाण्याचा रंग रक्ताप्रमाणे लाल झाला आहे. याचे व्हिडीओ समोर आले असून, सोशल मीडियावर व्हायरल झाले



आहेत. निसर्गाचा हा गूढ देखावा पाहिल्यानंतर हे द?श्य पृथ्वी नव्हे तर एखाद्या परग्रहावरील असावं असं वाटत आहे.

होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ पर्शियन आखातात असलेले हे छोटे बेट त्याच्या नाट्यमय भूदृश्य आणि बहुरंगी भूगर्भ रचनेसाठी आधीच प्रसिद्ध आहे. पण, जेव्हा पावसाचे पाणी होर्मुझच्या लोह-समृद्ध टेकड्या आणि मातीतून वाहते, तेव्हा त्याचे परिणाम मंत्रमुग्ध करणारे असतात.

शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे की, ही घटना बेटाच्या खडकांमध्ये असलेल्या आयर्न ऑक्साईड, विशेषतः हेमाटाईटच्या उच्च सांद्रतेमुळे घडते. पाऊस ही खनिजे विरघळवून वाहून नेत असताना, हे वाहते पाणी वाळू आणि उथळ समुद्राच्या पाण्याला रंगाची छटा देतात.

हेमॅटाईट, जे आयर्न ऑक्साईडचे ($FeO$) नैसर्गिकरीत्या आढळणारे खनिज रूप आहे, तेच मंगळ ग्रहावर दिसणाऱ्या लाल रंगांसाठीदेखील जबाबदार आहे आणि यामुळेच होर्मुझला कधीकधी 'पर्शियन आखाताचे इंद्रधनुष्य बेट' असे म्हटले जाते. जेव्हा ओलाव्याच्या संपर्कात येतात, तेव्हा हेमॅटाईट-समृद्ध मातीचे अधिक वेगाने ऑक्सिडीकरण होते, ज्यामुळे तिचा रंग अधिक गडद होतो. पावसाळ्यादरम्यान आणि त्यानंतर, हे सूक्ष्म खनिज कण धूप आणि पृष्ठभागावरील प्रवाहाद्वारे किनाऱ्यापर्यंत वाहून आणले जातात, ज्यामुळे किनाऱ्याला एका विशाल लाल रंगाचं रूप येतं. स्थानिक रहिवासी आणि पर्यटक या नैसर्गिक चमत्काराचे वारंवार फोटो, व्हिडीओ काढत असतात.

## ध्रुवीय अस्वल बदलताहेत स्वतःचा डीएनए!



वाढत्या तापमानाचा ताण दक्षिण ग्रीनलँडमधील ध्रुवीय अस्वलांच्या जनुकीय रचनेत बदल घडवून आणत असल्याचे एका नवीन संशोधनातून समोर आले आहे. हवामान बदलामुळे अस्तित्वाचा धोका निर्माण झाला असताना, स्वतःला वाचवण्यासाठी या अस्वलांमध्ये वेगाने जनुकीय उत्परिवर्तन होत असल्याचे शास्त्रज्ञांनी शोधले आहे.

जागतिक हवामान बदलामुळे ध्रुवीयअस्वलांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. फेब्रुवारी महिन्यात निर्माण होणाऱ्या समुद्रातील बर्फाचे प्रमाण विक्रमी पातळीपर्यंत खाली घसरले असून, वाढत्या उष्णतेमुळे समुद्राची पाणी पातळी वाढत आहे. ध्रुवीय अस्वल प्रामुख्याने बर्फाच्या थरांवर राहतात आणि तिथेच शिकार करतात. बर्फाचे हे थर आकुंचन पावत असल्याने त्यांच्या जगण्याचा संघर्ष तीव्र झाला आहे. दक्षिण ग्रीनलँडमधील अस्वलांचा एक समूह या आव्हानात्मक वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी स्वतःमध्ये उत्क्रांती घडवून आणत असल्याचे दिसून आले आहे. 'मोबाईल डीएनए' या जर्नलमध्ये १२ डिसेंबर रोजी प्रसिद्ध झालेल्या अभ्यासानुसार, हे अस्वल 'जम्पिंग जीन्स' चा वापर करून स्वतःचा डीएनए वेगाने 'री-राईट' (पुनर्लिखित) करत आहेत. मुख्य संशोधिका ॲलिस गॉडन यांच्या मते, 'ग्रीनलँडच्या सर्वात उष्ण भागात राहणारा हा अस्वलांचा गट वितळणाऱ्या बर्फाविरुद्ध जगण्यासाठी एक असाधारण धडपड करत आहे. 'जम्पिंग जीन्स'च्या माध्यमातून ते त्यांच्या जनुकीय रचनेत बदल करत असल्याचे प्रथमच सिद्ध झाले आहे. याला वैज्ञानिक भाषेत 'ट्रान्सपोसन्स' म्हटले जाते. हे 'ट्रान्सपोसन्स' अस्वलांना हवामान बदलाशी जुळवून घेण्यास मदत करत असल्याचे संशोधकांचे म्हणणे आहे. २०२२ मधील एका अभ्यासात असे आढळले होते की, दक्षिण ग्रीनलँडमधील अस्वलांची ही टोळी उत्तर ग्रीनलँडमधील अस्वलांपासून २०० वर्षांपूर्वी वेगळी झाली होती. ही टोळी बर्फावर कमी अवलंबून आहे. आताच्या ताज्या संशोधनाने या अस्वलांच्या जनुकीय बदलांवर अधिक शिक्कामोर्तब केले आहे.

### काय आहेत 'जम्पिंग जीन्स'?

'जम्पिंग जीन्स'ना विज्ञानाच्या भाषेत 'ट्रान्सपोसन्स' म्हणतात. हे डीएनएचे असे तुकडे असतात जे जीनोममधील एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलू शकतात. हे तुकडे जनुकीय कोडमध्ये ज्या ठिकाणी जाऊन बसतात, त्यानुसार इतर जनुके कशा प्रकारे कार्य करतील (Gene Expression) हे ठरते. ध्रुवीय अस्वलांच्या जीनोममध्ये एक तृतीयांशपेक्षा जास्त भाग या घटकांचा असतो. तुलनेने मानवी जीनोममध्ये याचे प्रमाण ४५ टक्के तर वनस्पतींमध्ये ७० टक्क्यांपर्यंत असते.



## सर्वात धोकादायक तुरुंग

'द गार्डियन'च्या रिपोर्टनुसार, अमेरिकेच्या कोलोराडो राज्याच्या रॉकी पर्वतांमध्ये लपलेला 'एडीएक्स फ्लोरेन्स' जो जगातील सर्वात धोकादायक तुरुंग मानला जातो. हा जगातील सर्वात हाय सिक्युरिटी सुपरमॅक्स तुरुंग आहे. हा तुरुंग १९९४ मध्ये बनला असून, इथे फक्त अशा लोकांना पाठवलं जात ज्यांना सरकार घाबरतं. मग ते दहशतवादी असो, सीरियल किलर असो किंवा गँग लीडर असो. या तुरुंगाचे नाव ऐकूनच केवळ गुन्हेगारी जगातच नाही तर सुरक्षा यंत्रणांमध्येही थरकाप उडतो.

'एडीएक्स फ्लोरेन्स' तुरुंगाचं डिझाईन असं करण्यात आलंय की याला 'एस्केप-प्रूफ' म्हणजे जिथून सुटण्याची शक्यता ० टक्के आहे. या तुरुंगाचा संपूर्ण परिसर काँक्रीटच्या मोठ्या ब्लॉक्स सारखा आहे. या तुरुंगाच्या भिंती एवढ्या मोठ्या आहेत की ज्यातून आवाज सुद्धा पलीकडे जाऊ शकत नाही. 'एडीएक्स फ्लोरेन्स' तुरुंगाच्या खिडक्या फक्त ४ इंच रुंद आहेत आणि त्यांचं डिझाईन असं आहे की, कैद्यांना बाहेरील दृश्य पाहता येत नाही. तुरुंगात कॅमेरे आणि सेन्सर्स आहेत. एकंदरीत व्यवस्था अशी आहे की, केवळ मानवच नाही तर हवा देखील परवानगीशिवाय बाहेर पडू शकत नाही. या तुरुंगात कैद्यांना दिवसाचे २३ तास एकट्याने सेलमध्ये राहावं लागतं. कैद्यांचे सेल हे अतिशय छोट्या आकाराचे असतात. ज्यात फक्त एक बेड, एक टॉयलेट आणि भिंतींवर लावलेले काही कंट्रोल सिस्टम असतात.

इथे कोणाला कोणाशी भेटायला दिलं जात नाही. एका अर्थाने कैद्यांना त्यांच्या स्वतःच्या सावलीपासूनही वंचित ठेवले जाते. तासन्तास शांतता, दगडांची थंडी आणि एकटेपणा हीच खरी कैद्यांसाठीची शिक्षा असते. या तुरुंगातील प्रत्येक कर्प?यांमध्ये हायटेक कॅमेरे आणि स्टीलचे अनेक लेयर्स असलेले दरवाजे फिट केले आहेत. कैद्यांच्या कक्षात प्रवेश करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक लॉकिंग सिस्टम बसवण्यात आली आहे आणि सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षक चोवीस तास तैनात असतात. अभेद्य सुरक्षा व्यवस्था असून सुद्धा तुरुंगातील प्रत्येक हालचालींची दोनदा तपासणी केली जाते. अन्न पुरवणे असो, औषधोपचार असो किंवा कैद्याला दुर्स?या ब्लॉकमध्ये हलवणे असो, येथे सर्वकाही नियोजन आणि देखरेखीसह केले जाते. कैद्यांना दिवसातून फक्त एक तासाचा एअर टाईम दिला जातो. या काळात ते एका लहान, काँक्रीटने बंदिस्त अंगणात मुक्तपणे फिरू शकतात. या तुरुंगातून एकही कैदी पळून गेलेला नाही.

## 'जेमिनी ३ फ्लॅश'मध्ये वेगळे काय?

गूगलने गुरुवारी आपल्या एआय तंत्रज्ञानातील प्रगतीचा पुढचा टप्पा गाठत नवीन आणि वेगवान एआय मॉडेल 'जेमिनी ३ फ्लॅश' लाँच केले आहे. गेल्या महिन्यात सादर झालेल्या 'जेमिनी ३'वर आधारित हे मॉडेल विशेषतः वेग, किफायतशीर दर आणि मोठ्या प्रमाणावरील कामांसाठी विकसित करण्यात आले आहे. कंपनीने या मॉडेलचे वर्णन 'वर्कहॉर्स मॉडेल' असे केले आहे.




गूगल आता जेमिनी ॲपमध्ये आणि गूगल सर्चच्या एआय मोडमध्ये 'जेमिनी ३ फ्लॅश' ला 'डिफॉल्ट मॉडेल' म्हणून सेट करत आहे. मात्र, यूजर्सना गणित किंवा कोडिंगसारख्या कठीण कामांसाठी मॅन्युअली 'जेमिनी ३ प्रो' निवडण्याचा पर्याय उपलब्ध असेल. 'जेमिनी ३ फ्लॅश'ने अनेक महत्त्वाच्या चाचण्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. गूगलच्या दाव्यानुसार, जेमिनी ३ फ्लॅश व्हिडीओ, फोटो आणि ऑडिओ अधिक चांगल्या प्रकारे समजू शकतो.

जर एखाद्या यूजरने 'पिकलबॉल'चा व्हिडीओ अपलोड करून त्याबद्दल विचारले, तर हे मॉडेल व्हिडीओ पाहून अचूक उत्तर देऊ शकते. यूजरने काढलेले स्केच ओळखून त्यावर भाष्य करणे किंवा ऑडिओ क्लिपचे विश्लेषण करून त्यावर आधारित क्विझ तयार करण्याची क्षमता यात आहे. हे मॉडेल 'व्हर्टेक्स एआय' आणि 'जेमिनी एंटरप्राईझ'वर उपलब्ध आहे. 'फिग्मा' आणि 'कर्सर' सारख्या कंपन्या आधीच याचा वापर करत आहेत. कोडिंगसाठी 'जेमिनी ३ प्रो' ने 'एसडब्ल्यूई बेंच' चाचणीत ७८ टक्के गुण मिळवले आहेत, ज्याला केवळ GPT-5.2 ने मागे टाकले आहे.

# आरटीओ-भाजप पदाधिकाऱ्याच्या संगनमताने 'हप्ते वसुलीचे रॅकेट'

## मुख्यमंत्र्यांकडे नितीन भुतारे यांनी केली चौकशीची मागणी



नगर - येथील आरटीओ कार्यालयात वाहन नोंदणी, फिटनेस प्रमाणपत्र, परवाने, परमिट, मालकी हस्तांतरण आणि कर भरणा यासारख्या विविध सेवांमध्ये दलालांचा हस्तक्षेप वाढला आहे. आरटीओ कार्यालयाबाहेर दलालांचे जाळे सक्रिय असून सर्वसामान्य नागरिकांना थेट सेवा मिळण्याऐवजी दलालांच्या माध्यमातूनच कामे करण्यास भाग पाडले जात आहे. तसेच अवैध वाहतुकीला राजकीय संरक्षण मिळत असून, एक भाजप पदाधिकारी हप्ते वसूल करुन आरटीओ अधिकाऱ्यांना पोहोचत करीत आहेत. त्यामुळे या प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी व्हावी, अशी मागणी नितीन भुतारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

भुतारे यांनी याबाबत मुख्यमंत्र्यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठविले आहे. त्यात म्हटले आहे, जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध जडवाहतुकीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असून, त्यामागे कथित हप्तेवसुलीचे रॅकेट कार्यरत आहे. अहिल्यानगर शहर व जिल्ह्यात दररोज मोठ्या प्रमाणावर जड मालवाहतूक सुरू असते. अनेक वाहने निर्धारित क्षमतेपेक्षा अधिक माल वाहून नेत असल्याने रस्त्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून अपघातांचा धोका वाढला आहे. मात्र, एवढ्या गंभीर परिस्थितीतही संबंधित वाहनांवर प्रभावी कारवाई होत नाही. अवैध वाहतूक करणाऱ्या काही वाहनमालकांना राजकीय संरक्षण मिळत असून, भारतीय जनता पक्षाच्या अहिल्यानगरमधील एका पदाधिकाऱ्यामार्फत कथित हप्ते गोळा करून ते आरटीओतील संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविले जातात. या कथित आर्थिक व्यवहारामुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई टाळली जात असल्याचा दावाही भुतारे यांनी केला आहे. या प्रकरणातील संबंधितांच्या बँक व्यवहारांची, मालमत्तेची आणि आर्थिक देवाणघेवाणीची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीसाठी आरटीओ कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज, तपासणी पथकांच्या दैनंदिन नोंदी, ओव्हरलोड वाहनांवर झालेल्या कारवायांचा तपशील, वसूल करण्यात आलेल्या दंडाची माहिती तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या कामकाजाची स्वतंत्र तपासणी करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. अन्यथा या विषयावर व्यापक जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही भुतारे यांनी दिला आहे.

# जिल्हा रुग्णालयात नोकरी लावून देण्याच्या बहाण्याने साडेतीन लाखांची फसवणूक

नगर - अहिल्यानगर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात मुलीला नोकरी लावून देतो असे खोटे आश्वासन देऊन एका व्यक्तीची ३ लाख ५४ हजार ८०० रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार पाथर्डी तालुक्यात उघडकीस आला आहे. या प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात एका संशयित आरोपीविरुद्ध ९ जुलै रोजी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शहादेव रामदास काळे (वय ४५, रा. माणिकदौंडी, ता. पाथर्डी) यांच्या फिर्यादीवरून हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. आरोपी अशोक तुळशीराम दाते (रा. माणिकदौंडी, ता. पाथर्डी) याने शहादेव काळे यांची मुलगी वैष्णवी हिच्या नोकरीचे आमिष दाखवले. तुमच्या मुलीला अहिल्यानगर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात नोकरीला लावून देतो, असे खोटे आश्वासन देऊन आरोपीने काळे यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्यांच्याकडून वेळोवेळी एकूण ३,५४,८०० रुपये रोख रक्कम स्वीकारली.

हा प्रकार १२ ऑक्टोबर २०२५ पासून ते आजतागायत फिर्यादीच्या घरी घडला. पैसे घेऊनही मुलीला नोकरी न लावल्याने आपली फसवणूक झाल्याचे काळे यांच्या लक्षात आले. अखेर ९ जुलै रोजी त्यांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी अशोक दाते याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) प्रमाणे गुन्हा नोंदवला आहे. अद्याप आरोपीला अटक झालेली नाही. पाथर्डी पोलीस ठाण्याचे पो.नि. आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे.कॉ.मरकड पुढील तपास करत आहेत.

# एकापेक्षा जास्त विजेत्यांची मालकी असण्याच्या बाजूने

एखाद्या गुंतवणूकदाराला २००८ च्या सुरूवातीस विचारले असते, की त्यावर्षी कोणता ॲसेट त्यांना सर्वात चांगली सेवा देईल तर मोजक्याच लोकांनी सोन्याचे नाव घेतले असते. पुन्हा २००९ च्या सुरूवातीस विचारले असते, तर आणखी मोजक्या लोकांनी भारतीय इक्विटीची बारा महिन्यांत ८१ टक्के वाढ होण्याच्या बाजूने मत दिले असते.

ऐतिहासिक नोंदींतून हे सिद्ध होते. इक्विटी एक दशकाहून अधिक काळ साधारणपणे सपाट राहिली, त्यानंतर काही मोजक्या वर्षांसाठी वार्षिक ४० टक्के च्या जवळपास चक्रवाढ दर गाठण्यात आला. त्यानंतर ती शांत, उच्च एक-आकडी वाढीमध्ये स्थिर झाली आहे. सोन्याने तशीच लय साधली आहे: जवळजवळ शून्य परताव्याचे दीर्घ एकत्रीकरण, त्यानंतर वार्षिक २० टक्के पेक्षा जास्त होऊन त्यात खंड पडला. याउलट, बाँड्सला क्वचितच मथळ्यात स्थान मिळते. त्यांचा २००७ पासून पाच वर्षांचा रोलिंग परतावा सरासरी ७ टक्के आहे, तो इक्विटी किंवा सोन्यापेक्षा कितीतरी कमी पातळीवर आहे. नेमके यामुळेच वैविध्यपूर्ण पोर्टफोलिओमध्ये ते मौल्यवान ठरतात.



आदित्य अरविंद देशपांडे

या पॅटर्नमधून एक सोपा मुद्दा समोर येतो : नेतृत्व फिरत राहते, बहुतांश वेळेस अचानकच फिरते. पुढील विजेत्याचा अंदाज लावण्याचा प्रयत्न करण्याऐवजी, गुंतवणूकदारांना तिन्ही मालमत्ता वर्गांचे मालक बनून अधिक लाभ मिळू शकतो.

आयसीआयसीआय प्रुडेन्शियल मल्टी-ॲसेट ॲक्टिव्ह एफओएफ एकाच पोर्टफोलिओमध्ये अशी रचना उपलब्ध करून देतो. बाजाराची परिस्थिती आणि प्रत्येक मालमत्ता वर्गाच्या सापेक्ष आकर्षणानुसार इक्विटी, डेट आणि सोने/ चांदीमध्ये गतिशील वितरण कायम राखण्यासाठी त्याची रचना करण्यात आलेली आहे. या फंडात सक्रिय व्यवस्थापन असलेल्या इक्विटी-ओरिएंटेड योजनांमध्ये ३०-८० टक्के, सक्रिय व्यवस्थापन असलेल्या कर्ज-केंद्रित योजनांमध्ये १० -६० टक्के आणि गोल्ड ईटीएफ आणि/ किंवा सिल्व्हर ईटीएफमध्ये १०-३० टक्के गुंतवणूक करण्यात येते. यामध्ये मूल्यांकन आणि बाजाराच्या परिस्थितीवर आधारित वेळोवेळी पुनर्संतुलनही करण्यात येते. त्यामुळे गुंतवणूकदारांना वेळ देण्याची किंवा फंडांमध्ये आलटून पालटून बदल करण्याची आवश्यकता कमी होते. ही एनएफओ १४ जुलै २०२६ पर्यंत सबस्क्रिप्शनसाठी खुली आहे.

# संत निवृत्तीनाथ महाराज दिंडी मुक्कामासाठी मुख्य व नेप्ती उपबाजार दोन दिवस बंद

नगर - श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून श्री क्षेत्र पंढरपूरकडे पायी निघालेला श्री संत निवृत्तीनाथ महाराज पालखी पायी दिंडी सोहळा अहिल्यानगरमध्ये येत असल्याने, कृषी उत्पन्न बाजार समितीने मुख्य बाजार मार्केट यार्ड व नेप्ती उपबाजार दोन दिवस बंद ठेवण्याचा महत्वाचा निर्णय घेतला आहे.

हा पालखी सोहळा ११ जुलै व १२ जुलै या दोन दिवसांच्या मुक्कामासाठी बाजार समितीच्या भुसार व भाजीपाला यार्डवर थांबणार आहे. या दिंडीमध्ये सुमारे ५० हजार वारकरी सहभागी असून, त्यांच्या जेवणाच्या व इतर नियोजनासाठी माथाडी कामगारांची आवश्यकता भासणार आहे. याच पार्श्वभूमीवर १२ जुलै आणि १३ जुलै रोजी बाजार समितीचे नेप्ती उपबाजार दोन दिवसांकरिता पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. १४ जुलै पासून नेप्ती उपबाजार पुन्हा नियमितपणे सुरु होईल, अशी माहिती बाजार समितीचे सचिव अभय भिसे यांनी दिली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडून विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालू नाही अथवा प्रलंबित नाही व सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे, पतसंस्थेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही. असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **०७ दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता.१०/०७/२०२६.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन** : जिल्हा अहिल्यानगर पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर हद्दीतील **मौजे माळीवाडा येथील** खालील वर्णनाची प्लॉट मिळकत - **सर्व्हे नं.७३ मधील प्लॉट नं.१६ चे एकूण क्षेत्रफळ २३२.०० चौ.मी. हा संपूर्ण प्लॉट. यांसी चतुःसिमा :-**

पुर्वेस :- ९.०० मीटर अंतर्गत रस्ता, दक्षिणेस : ४.५० मीटर अंतर्गत रस्ता

पश्चिमेस :- प्लॉट नं.१५, उत्तरेस :- प्लॉट नं.१७

वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक - दिलीप भिमाजी ठोकळ,

रा. आंबेकर तालीम जवळ, सारसनगर, ता.जि. अहिल्यानगर.

**ॲड. समीर वखारे**

पत्ता :- ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहिल्यानगर, मो. नं. 9011678999. 9860805559

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की. खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकतीबाबत कळविण्यात येते की, सदरची मिळकत ही आमचे आशिल वसंत बबनराव भांडकर यांचे वडील बबनराव गणपत भांडकर यांनी दिनांक २२.०७.२०१० रोजी आमचे अशिलाचे बंधु प्रमोद बबनराव भांडकर. रा. पाथर्डी. ता. गाथर्डी, जि. अहमदनगर यांचे नावे खरेदी केलेली होती व आहे.सदर मिळकत ही बबनराव भांडकर यांनी कौटुंबिक नियोजनाकरीता प्रमोद बबनराव भांडकर यांचे नावे खरेदी केलेली होती. परंतु बबनराव भांडकर यांना तीन मुले नामे वसंतराव बबनराव भांडकर, दिलीप बबनराव भांडकर व प्रमोद बबनराव भांडकर अशी मुले व चार मुली रंजना, विलासिनी, हिराबाई राऊ, मानिक अशी अपत्य होती. सदर मिळकत ही एकत्र कुटुंबाकरीता खरेदी केलेली आहे. आमचे अशिलाचे वडील बबनराव भांडकर यांचे मृत्यूनंतर सदरची मिळकत ही एकत्रीत कुटुंबाचे मालकी हक्काची झालेली आहे. परंतु प्रमोद बबनराव भांडकर यांचे नावावर आमचे अशिलाचे वडिलांनी सदर जमीन खरेदी केल्यामुळे मालकी हक्क सदरी त्यांचे नाव लागलेले आहे. सदर मिळकतीवर प्रमोद बबनराव भांडकर यांचे नाव लागल्याचा गैरफायदा घेवून प्रमोद बबनराव भांडकर हे सदरची मिळकत लबाडीने खोटी माहिती देवून विक्री करण्याचे तयारीत आहेत. अशी माहिती आमचे अशिलास समजलेली आहे. सदरची मिळकतीमध्ये आमचे अशिलाचा अविभक्त हिस्सा आहे. सदर मिळकतीबाबत लवकरच मे. कोर्टात वाटपाबाबत दावा दाखल करणार आहेत.

सबब सदरची परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीबाबत कोणीही हस्तांतरणाचा व्यवहार करू नये केल्यास त्यास कोणताही हक्क मिळणार नाही याची या जाहीर नोटीसीने नोंद घ्यावी. कोणाचीह फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे.

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा तुकडी अहमदनगर पोट तुकडी नगर तालुका नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मंगलगेट येथील सिटी सर्व्हे नं. १५८२ क्षेत्र २६.८ चौ.मी. व सिटी सर्व्हे नं. १५८३ क्षेत्र ४६.00 चौ.मी.

**यासी चतु:सिमा** - पुर्वेस - सि.स.नं.१६१९, दक्षिणेस -सि.स.नं.१५२६, पश्चिमेस- वाग व रोड उत्तरेस - सि.स.नं. १५८४

दिनांक -०९/०७/२०२६ **ॲड. लक्ष्मण कुंडलीक पोकळे**

(बीकॉम एल.एल.बी.)

३१६, लॉयर्स चेंबर, जिल्हा न्यायालय

अहमदनगर मोबा. ९४२०७९७५३०

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठ वर्णन केलेली मिळकत ही विद्यमान मालक **ज्योती मधुकर कराळे रा. शिवानंदन प्लाझा, एकवीरा चौक, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची आहे. सदर मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेल्या मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला असून, सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद मिळकत बाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात (७) दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन : -**

डि।। अहिल्यानगर सब डि!। तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अ. नगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे भिस्तबाग येथील सर्व्हे नं. २/१३अ/२/२/२/४३अ मधील प्लॉट नं. ५ याचे एकूण क्षेत्र ४८२.८२ चौ. मी. यापैकी विदयमान मालक यांच्या मालकीचे उत्तर बाजुकडील प्लॉटचे क्षेत्रफळ २४१.४९ चौ.मी. हे संपूर्ण क्षेत्र.**

**यांसी चतुःसिमा खालीलप्रमाणे.**

पुर्वेस :- प्लॉट नं. १५ व १६ भाग, दक्षिणेस :- प्लॉट नं. ५ पैकी उर्वरित क्षेत्र

पश्चिमेस :- नियोजित डिपी रोड, उत्तरेस :- प्लॉट नं. ४,

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

अहिल्यानगर

दिनांक :- ०९/०७/२०२६

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**

**ॲड. ओंकार पंडीत मोरे**

ऑफिस -शॉप नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर, मो नं. ९८६०६४६४६२,


# रिक्षाचालकाचे बंद घर फोडून सोन्याचे दागिने चोरट्यांनी पळविले

नगर - नगर तालुक्यातील खातगाव टाकळी येथे एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी घरातून ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घरफोडी २९ जून रोजी संध्याकाळी ७ वाजेपासून ते ८ जुलै रोजी दुपारी १२.३० वाजेच्या दरम्यान घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खातगाव टाकळी (ता. जि. अहिल्यानगर) येथील मूळ रहिवासी असलेले आणि सध्या मुंबई येथे वास्तव्यास असलेले ५१ वर्षीय रिक्षाचालक प्रविण सूर्यभान कुलट यांचे खातगाव टाकळी येथे घर आहे. २९ जून ते ८ जुलै दरम्यान त्यांचे घर बंद असताना, अज्ञात चोरट्यांनी घराचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी कपाटातील ८०हजार रुपये एकूण किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले.

८ जुलै रोजी दुपारी हा प्रकार लक्षात आल्यानंतर प्रविण कुलट यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३३१(३), ३३१(४), ३०५(अ) प्रमाणे गुन्हा नोंदवला आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी स.पो.नि. हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे.कॉ. राजू सुद्रीक पुढील तपास करत आहेत.

# केडगाव येथे घरात घुसून दोघा महिलांना मारहाण

नगर - केडगाव परिसरातील शाहूनगर येथे घरासमोरील गटार चेंबरवर कचरा पडल्याच्या कारणावरून वाद घालून घरात घुसून २ महिलांना मारहाण केल्याची घटना ९ जुलै रोजी दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास घडली.याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना

याबाबत सोनाली अमित नवले (वय ३२, रा. मुळे कॉलनी, शाहूनगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. घरासमोर कचरा पडल्याच्या कारणावरून आरोपी कल्पना भास्कर ठोकळ आणि तन्मय भास्कर ठोकळ (दोन्ही रा. मुळे कॉलनी, शाहूनगर, केडगाव) यांनी फिर्यादीसोबत वाद घातला. त्यानंतर आरोपींनी बेकायदेशीरपणे घरात प्रवेश करून फिर्यादी सोनाली आणि त्यांच्या जावेला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत शिवीगाळ व दमदाटी केली. तसेच आरोपी तन्मय ठोकळ याने फिर्यादीच्या सासऱ्यांना घरातील झाडूने पाठीवर व हातावर मारून दुखापत केली. या घटनेनंतर सोनाली नवले यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११५(२), ३३३, ३५१(२), ३५२, ३(५) प्रमाणे गृहअतिक्रमण आणि मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे.

# घराचे कुलूप चोरट्यांनी तोडून सोन्याची चेन, रोख रक्कम लंपास

नगर - एमआयडीसी जवळील नवनागपूर परिसरात सम्राट नगर येथे एका घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी १ लाख रुपये किमतीची सोन्याची चेन आणि रोख रक्कम चोरून नेल्याची घटना ८ जुलै रोजी रात्री ११.३० वाजेपासून ते ९ जुलै रोजी पहाटे ५ वाजेच्या दरम्यान घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संदीप अंकुश दुसुंगे (वय ४०, रा. सम्राटनगर, नवनागपूर)यांनी फिर्याद दिली आहे. चोरट्यांनी त्यांच्या घराच्या खालच्या मजल्यावरील खोलीच्या दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर कपाटाचे लॉक तोडून त्यात ठेवलेली सोन्याची चेन आणि रोख रक्कम असा एकूण १ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून पोबारा केला. ९ जुलै रोजी पहाटे हा प्रकार उघडकीस आल्यानंतर संदीप दुसुंगे यांनी पोलिसांनी माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे स.पो.नि. हेमंत थोरात यांनी पोलीस पथकासह घटनास्थळी भेट देत पाहणी केली.

या प्रकरणी संदीप दुसुंगे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिताकलम ३०५(अ), ३३१(४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पो.हे.कॉ. रोहकले पुढील तपास करत आहेत.

# सावेडीतील अतिक्रमणांवर मनपाची कारवाई; भाजीबाजार, टपऱ्या, अनधिकृत फलक हटवले

नगर - शहरातील वाढत्या अतिक्रमणांवर महापालिकेने १० जुलै रोजी कारवाईची मोहिम राबवली. सावेडी उपनगरातील पाईपलाईन रोड, परिजात चौक, एकविरा चौक ते यशोदानगर तसेच प्रोफेसर चौक येथील जॉगिंग ट्रॅक परिसरातील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली. या मोहिमेत भाजीबाजार, टपऱ्या, शेड तसेच अनधिकृत फ्लेक्स बोर्ड हटविण्यात आले.

सावेडी उपनगरातील वाढत्या अतिक्रमणांविषयी महापालिकेच्या प्रभाग समिती १ कडे मोठ्या प्रमाणात तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. तसेच रस्त्याच्याकडेलाच अनेकजण वाहतुकीला अडथळा होईल, अशा पद्धतीने टपऱ्या मांडून व्यवसाय करीत असल्याच्याही तक्रारी होत्या. काहीजण रस्त्यावरच भाजीचा ठेला मांडून विक्री करीत असल्यामुळे वाहतुकीला अडथळा होत आहे, अशी तक्रारही महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाकडे दाखल करण्यात आली होती. या तक्रारींची दखल घेत महापौर ज्योतीताई गाडे, महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली



सावेडीतील पाईपलाईन रोडवरील अनधिकृत फ्लेक्स बोर्ड हटवितांना महापालिकेचे अतिक्रमणविरोधी पथक.

१० जुलै रोजी सकाळी अतिक्रमण हटाव मोहिमेला प्रारंभ झाला. यामध्ये अतिक्रमण विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ, क्षेत्रीय अधिकारी देविदास बिज्जा व राहुल साबळे, प्रभाग अधिकारी गणेश वाकळे यांच्या पथकाने या कारवाईत सहभाग घेतला. यावेळी नगरसेवक अजिंक्य बोरकर, निखिल वारे, बाळासाहेब पवार, सुरेश त्रिंबके तसेच ॲड. महेश तवले हेदेखील उपस्थित होते.

कारवाईदरम्यान पारिजात चौकातील अनधिकृत फ्लेक्स बोर्ड जप्त करण्यात आला. तसेच प्रोफेसर चौक व परिसरातील रस्त्यावर उभारण्यात आलेले तात्पुरते व्यवसाय, लोखंडी फलक आणि शेड हटविण्यात आले. त्यामुळे या मार्गावरील वाहतुकीतील अडथळे दूर होऊन नागरिकांना दिलासा मिळाला. ही कारवाई दिवसभर सुरु होती. यापुढेही अतिक्रमणांविरोधात अशाच प्रकारच्या कारवाया सातत्याने सुरू राहणार असल्याचा इशारा महापालिका प्रशासनाने दिला आहे.

# ऑपरेशन शोध- ४ मोहिमेत पोलिसांकडून ९८ बेपत्ता बालकांचा शोध

नगर -महाराष्ट्र पोलीस महासंचालकांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या ऑपरेशन शोध- ४ या विशेष मोहिमेत पोलिसांकडून तब्बल ९८ बेपत्ता बालकांचा शोध घेण्यात आला आहे. ही विशेष मोहीम ८ जून ते २३ जून या कालावधीत जिल्हाभरातील सर्व पोलीस ठाणे, विशेष पथके आणि अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष (एएचटीयू) यांच्या समन्वयातून राबविण्यात आली.

शोध घेण्यात आलेल्या बालकांमध्ये ९० मुली आणि ८ मुलांचा समावेश असून, आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर या सर्व मुलांना त्यांच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. सदर मोहिमेत प्रत्येक पोलीस उपविभागीय कार्यालय, पोलीस ठाण्यांच्या मार्फत विशेष पथके नेमून सक्रीय सहभाग नोंदविण्यात आला. गोपनीय माहिती संकलन, व्यावसायिक कौशल्य वापरून तसेच इतर जिल्ह्यांशी समन्वय ठेवून ही मोहीम यशस्वी करण्यात आली. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, पोलीस उपअधीक्षक गणेश उगले यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष पो. नि. किरण शिंदे, स.फौ. शकील अहमद, पो.हे.कॉ. समीर सय्यद, महिला पो.हे.कॉ. अर्चना काळे, अनिता पवार, महिला पो.कॉ. छाया रांधवन यांच्या पथकाने ही मोहीम यशस्वीरीत्या पार पडली असून, बालकांच्या शोधासाठी अशा प्रकारच्या मोहिमा पुढेही राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे.

# पत्रकार असल्याचे सांगत वाळू वाहतूक करण्यासाठी २० हजारांची खंडणी मागणाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल

कोपरगाव - गोदावरी बचाव कृती समितीचा सदस्य आणि पत्रकार असल्याचे सांगून वाळू वाहतूक करण्यासाठी एका शेतकऱ्याकडे २० हजार रुपयांची खंडणी मागितल्याचा आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार कोपरगाव तालुक्यातील सांगवी भुसार येथे उघडकीस आला आहे.

याप्रकरणी कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात संशयित आरोपी मतीन बाबुलाल शेख (रा. कोळगाव थडी, ता. कोपरगाव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील सांगवी भुसार येथील शेतकरी अजय किसन जाधव (वय २५) यांनी यासंदर्भात कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात ९ जुलै रोजी तक्रार दिली आहे. आरोपीने फिर्यादी जाधव यांना तुझे वाळू वाहतूक करतानाचे फोटो माझ्याकडे आहेत, तुझ्यावर तहसीलदार यांच्यामार्फत कारवाई करायला लावेन अशी भीती दाखवून २० हजार रुपयांची मागणी केली.

फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिला असता, आरोपीने व्हाट्सप कॉल करून मी तुझ्या बातम्या चालू केल्या आहेत. आता तुला मला पैसे देण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. आता मी पुढे काय करतो बघ, तुझ्या भागातील वाळू वाहतूक करणारे माझे मित्र आहेत. त्यांना सांगून तुझा ट्रॅक्टर पलटी करायला लावतो किंवा तुला ट्रॅक्टर खाली घालायला लावतो असे म्हणत जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच १८ जून पासून ७ जुलै पर्यंत वारंवार धमकावत पैशांची मागणी केली. या धमक्यांना कंटाळून अजय जाधव यांनी ९ जुलै रोजी कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी मतीन शेख याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०८(४) प्रमाणे गुन्हा नोंदवला असून, पोलीस उपनिरीक्षक चौधरी पुढील तपास करत आहेत.

# आनंदऋषीजी योगा सेंटर

## आनंदयोग मधील योग साधकांचे अभिप्राय

मी, सौ. शैलेजा राजेन्द्रप्रसाद सिकची, वय ६५ वर्षे गेल्या १० वर्षापासून योगा क्लासला येत आहे. माझे वजन थोडे जास्तच आहे. पण रोज योगा क्लासला येत असल्याने माझे वजन स्थिर आहे.

आपल्या जीवनामध्ये योगाचे महत्व अनन्यसाधारण आहे. नियमित योगा क्लास केल्यास ताण-तणावापासून आपल्याला बरे वाटते. सकाळी उठून प्राणायाम केल्याने आपल्याला पूर्ण दिवस उत्साहाने राहता येते. योगामुळे आपल्या शरीराला शिस्त येते. प्रत्येकामध्ये सकारात्मक दृष्टीकोन येतो. योगामुळे मोठ्या विकारावर मात करु शकतो. योगामुळे पचनशक्ती सुधारते. मन आनंदी राहते. योगामुळे शरीराची लवचिकता वाढते आणि स्नायू मजबूत होतात. हृदयाचे आरोग्य चांगले राहते व योगामुळे रोग प्रतिकारक शक्ती वाढते.

तन आणि मन याचा संकलित व्यायाम म्हणजे योगासन आहे. योगा म्हणजे प्रत्येक मानवासाठी उत्तम प्रकारची देणगी आहे. फक्त योगा क्लास रोज नियमित करणे फारच आवश्यक आहे. ती आपल्याला निरोगी राहण्यास मदत करते. असे आमचे योगगुरु अनिल मेहेर सर स्वतः ही योगा करतात व आमच्याकडून करुन घेतात. असे त्यांचे हे महान कार्य आहे. परमेश्वर त्यांना दीर्घायुष्य देवो ही आमची परमेश्वरास विनंती आहे.

त्याचबरोबर झुंबा डान्स, वेगवेगळे हास्यप्रयोग घेतात. तेही तेवढेच महत्वाचे आहे.



अखेर असेच म्हणावयास वाटते की खरोखरच योगा ही जादू आहे. योग करा व तंदुरुस्त रहा.

- सौ. शैलेजा सिकची,

आयटीआय रोड, अहिल्यानगर

